श्री

# मावळा सरदार.

विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे

यांचें चरित्र.

पुस्तक ४ थें.

लेखक व प्रकाशक,

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.

किंमत १० आणे.

२।१६४

च-३२४

इ/१६४

श्री

# मावळा सरदार.

विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे

यांचें चरित्र.

पुस्तक ४ थें.

लेखक व प्रकाशक,

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.

दादर, मुंबई नं. १४.

' रवींद्र प्रिंटींग वर्क्स ' गिरगांव मुंबई, येथें छापिलें.

सन १९२४.

किंमत १० आणे.

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व मालकी हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

श्री

# प्रस्तावना.

—:०:—

**थोर महात्मे होऊनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा ।**
**आपण त्यांच्या समान होऊं हाच सांपडे बोध खरा ॥**

**जीवित महत्म्य.**

अनेक देशांमध्यें जे थोर पुरुष होऊन गेले, त्यांचीं कीर्तिरूप चरित्रें सतत आपल्या डोळ्यांपुढें असल्यानें त्यांच्यापासून आपलाहि फायदा होणें शक्य आहे. थोर पुरुष जे असतात त्यांची कीर्ति दिगंतीं गाजत असते. तिला आमच्या लेखांनीं किंवा शब्दांनीं तिळमात्रही भर पडणार नाहीं, परंतु त्यांची कृति, त्यांचे उद्योग, त्यांची सद्बुद्धी, त्यांची सत्यनिष्ठा, तद्वत् त्यांचें धैर्य, शौर्य, निर्लोभता, स्वराज्यनिष्ठा इत्यादि त्यांच्या अंगच्या गुणांनीं, त्यांचीं चरित्रें अत्यंत बोधप्रद झालेलीं असतात व असल्या चरित्रांपासून वाचकांच्या विचारांस व आचारांसहि एकप्रकारें उदात्त वळण लागण्याचा संभव असतो. ह्मणूनच ह्या लाभापुढें दुसऱ्या कोणत्याहि लाभाची मात्तबरी नाहीं.

सांप्रत महाराष्ट्रांत आपल्या पूर्वजांचा इतिहास प्रसिद्ध करण्याचा संघटित प्रयत्न होत आहे. हें सुदैवच समजलें पाहिजे. त्याप्रमाणें त्यांच्यांतील थोर पुरुषांचीं चरित्रेंहि प्रसिद्ध होणें अवश्य आहे. तेणेंकरून आपल्या महाप्रतापि पूर्वजांच्या अनेक गुणांची पारख होऊन त्यांची योग्यता किती होती, हें जाणण्यास आह्मांस सवड मिळेल. तद्वत् त्या काळांत व सांप्रत कोणती उणीव आहे, हें समजण्यास योग्य साधन होऊन आम्हीं कोणता मार्ग स्वीकारावा ह्याची

योग्य निवड आम्हांस करितां येईल. परंतु आमच्या पूर्वजांचीं चरित्रेंच लिहिलीं गेलीं नाहींत, तर हा भेद पारखणारांनीं तरी कसा पारखावा ! !

सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत जीं अनेक **नर–रत्नें** आपल्या मर्दुमकीनें, साहसानें, व बुद्धिचातुर्यानें प्रसिद्धीस आलेलीं होतीं, त्यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं असतां आपणांस तद्वत् आपल्या भावी पिढीस त्यांच्या गुणांचा व कृत्यांचा आदर उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या हेतूनें **मावळा सरदार विश्वासराव नानाजी दिघे देशपांडे** यांचें चरित्र आम्हीं लिहिलें आहे.

या चरित्रांत चरित्रनायकांच्या घरण्याची प्राचीन माहिती जितकी उपलब्ध झाली तितकी दिली आहे. त्याचप्रमाणें, त्यांच्या पूर्वजांनीं **बहामनी राज्यांत** व तदनंतर **निजामशाही, अदिलशाही** वगैरे राज्यांत स्वपराक्रमानें अनेक वतनें संपादन केलीं. त्याची हकिकत शक्य ती दिली आहे. मोगलांनीं महाराष्ट्र आपल्या ताब्यांत आणण्याकरितां जे अनेक अघटित प्रयत्न केले, त्यावेळीं महाराष्ट्रांत सर्वत्र यवनशाही होऊन हिंदुचें नांव तरी राहतें किंवा नाहीं, अशी परिस्थिति होऊन गेली होती. अशा भयंकर परिस्थितींत **श्रीशिवाजी महाराजांनीं** स्वातंत्र्याचें व स्वधर्माचें संरक्षण करण्याकरितां राजकारण चालू केलें ! ह्यावेळीं **चरित्रनायक** विजापूरकरांचे अंकित असतांहि आपल्या स्वार्थाची किंवा अदिलशहाकडून होणाऱ्या शासनाची यत्किंचितहि पर्वा न करितां, केवळ स्वधर्म संरक्षणार्थ ते **शिवाजी महाराजांच्या** राजकारणांत स्वयंस्फूर्तीनें येऊन मिळाले. तेव्हांपासून आमरण महाराष्ट्रास यवनांच्या जाचांतून मुक्त करण्याकरितां त्यांनीं स्वराज्याची एकनिष्ठ सेवा केली. या थोर पुरुषाच्या चरित्राची महाराष्ट्रीयांस सांगोपांग माहिती मिळावी, या हेतूनें हें चरित्र

लिहिलें आहे. त्यांत त्यांच्या घराण्याची अर्वाचीन माहिती उपलब्ध झाली ती व महत्वापुरती वंशावळ शेवटीं दिली आहे.

**ऐतिहासिक जुने-लेख** व **चरित्रें** स्वतंत्रच प्रसिद्ध करावीं, असें निश्चित ठरवून **चिटणीस घराण्याचीं** दोन पुस्तकें प्रसिद्ध केल्यानंतर प्रस्तुत चरित्र सर्वांग सुंदर व्हावें, म्हणून त्या घराण्यांतील अनेक गृहस्थांकडे अनेक वेळां पत्रद्वारें विनंती करून ऐतिहासिक माहिती मागविली; परंतु फक्त दोनच सन्माननीय गृहस्थांकडून माहिती आली—एक श्री. रामराव नारायण प्रधान व दुसरे श्री नारायण रघुनाथ देशपांडे ( हल्लीं कैलासवासी. ) त्यांत श्री देशपांडे यांनीं **चरित्रनायकाच्या** बाळपणाची माहिती व वंशावळ पाठविली होती. त्यामुळें त्यांच्या लहानपणाची माहिती लिहिण्याचा सुयोग आला.

शेवटीं ज्या गृहस्थांनीं आह्मांस चरित्र लिहिण्यासंबंधीं माहिती दिली व ज्या ग्रंथांचे आधार घेतले, त्या ग्रंथकर्त्यांचा व माहिती देणारांचा चरित्रलेखक अत्यंत आभारी आहे.

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.**

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना ... .... ... ... ... | १–३ |
| भाग १ ला–पूर्व वृत्तांत ... ... ... ... | १–७ |
| भाग २ रा–बाळपण व तत्कालीन परिस्थिती ... ... | ८–१३ |
| भाग ३ रा–स्वराज्यसेवा ... ... ... ... | १४–२४ |
| भाग ४ था–पराक्रम व शेवट ... ... ... | २५–४४ |
| उपसंहार– ... ... ... ... ... | ४५–५६ |
| वंशवृक्ष– ... ... ... ... ... | ५७ |


—:o:—

## हें चरित्र लिहिण्यास खालील ग्रंथाचें आधार घेतले आहेत.


१ चौककर कृत–दिक्षित उर्फ दिघे घराण्याची त्रोटक हकिकत व वंशवृक्ष.

२ प्रभुरत्नमाला.

३ शिवदिग्विजय.

४ मराठी रियासत पूर्वार्ध.

५ राजवाडेकृत खंड १५ वा.

६ चिटणीसकृत शिवाजीचें चरित्र.

७ प्रभुकुलदीपिका.

८ चां. का. प्रभूंच्या इतिहासाची साधनें ( मासिक)

९ इतिहास संग्रह ( मासिक )

श्री

# अर्पणपत्रिका.

परमपूज्य श्रीयुत

**रामराव नारायण उर्फ काकासाहेब प्रधान, विळेकर**

**लेखक,**

चां. का. प्रभूंचा इतिहास, विद्यार्थी, प्रभुकुलदीपिका,

चां. का. प्रभु समाजाच्या इतिहासाचें दिग्दर्शन वगैरे

**पुस्तकांचे कर्ते**

यांस

**हें चरित्र**

त्यांच्या ऐतिहासिक सामाजिक सेवोत्सुकतेबद्दल

आदर वाटणाऱ्या ग्रंथकर्त्यानें

अत्यंत परिचयाचें स्मरण ह्मणून नम्रतापूर्वक

अर्पण केलें आहे.



श्री. रामराव नारायण उर्फ काकासाहेब प्रधान, विळेकर.

श्री

DECCAN VERNACULAR TR... POONA. 1894

# मावळा सरदार.

## विश्वासराव नानाजी दिघे, देशपांडे यांचें चरित्र.

## भाग पहिला

### पूर्व वृत्तांत.

श्री छत्रपति शिवाजीमहाराजांच्या काळांत स्वाभिमानी व देशभक्त असे अनेक लोक निर्माण झाले ह्मणूनच त्यांना मराठी पादशाहीचा पाया घालितां आला, तद्वत् त्यांचे सर्व प्रयत्न यशस्वी झाले. त्यावेळीं त्यांना जर हजारों स्वाभिमानी व देशभक्त, आपल्या प्रियप्राणावर उदार होऊन येऊन मिळाले नसते, तर त्यांच्या एकट्याच्या हातून हिंदूपदपादशाही, स्थापण्याचें मोठ्या जोखमाचें काम पार पडलें असतें किंवा नाहीं, याबद्दल बरीच शंका येणें साहजिकच आहे. स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यांत अनेक **नर-रत्नें** पैदा व्हावीं लागतात. स्वातंत्र्य मिळवून स्वराज्य स्थापन करणें, हें एकट्या दुकट्याला अगदीं अशक्य आहे. हें एकाचें काम नाहीं, तें अनेकांचें काम आहे. त्याला पुष्कळ

वीरांचें साह्य लागतें, तद्वतच त्यांच्या अंतःकरणांची जरूरी लागते. तें करण्याकरितां हजारों, लाखोशें लोकांचें संगनमत व्हावयास पाहिजे. मतभेद अगर जातिद्वेष समूळ नष्ट झाला पाहिजे. अशी एकजूट व एकजीव झाल्यावरच तें कार्य यशस्वी होतें. **श्रीशिवाजीमहाराजांस** स्वाभिमानयुक्त व देशप्रीतीनें प्रेरित झालेले वीर मिळाले, ह्मणूनच, त्यांना यवनी राज्यावर तीव्र आघात करून, त्यांस कमकुवत करितां आलें, व मराठी राज्याची इमारत अल्प अवकाशांतच उभारतां आली. ही इमारत बांधण्याच्या कामीं ज्यांनीं प्रथमपासूनच स्वयंस्फूर्तीनें साह्य केलें. त्या **नररत्नां**पैकीं **मावळा सरदार विश्वासराव नानाजी** हे एक होत; ह्मणूनच त्याचें अल्प चरित्र आह्मीं वाचकांस सादर करीत आहोंत.

आमच्या देशाचा प्राचीन इतिहास उपलब्ध नाहीं. ही एक मोठी उणीव आहे; परंतु ही उणीव आतां सर्वस्वीं भरून निघणें शक्य नाहीं. आमच्या प्राचीनांनीं आपला वृत्तांत लिहून ठेविला नाहीं, त्याबद्दल त्यांनाहि दोष देतां येत नाहीं. कारण त्या वेळीं एक तर इतिहास लिहिण्याचा परिपाठ कमीं असावा, शिवाय त्यांस राज्यअस्थिरतेमुळें वारंवार इकडूनतिकडे आणि तिकडून दुसरीकडे, प्रयाण करणें भाग पडे. यास्तव देहसंरक्षणार्थ त्यांस काल कंठावा लागे. अर्थात् लेख लिहिण्यास अगर ते सुरक्षित ठेवण्यास दुरापास्तच असे. परंतु जी कांहीं माहिती उपलब्ध आहे, तिचा शक्य तो फायदा घेऊन तिचे संगोपनार्थ प्रयत्न करावा हेंच आतां योग्य आहे. असो !

**चांद्रसेनीय कायस्थ प्रभु ज्ञातींत** जीं कित्येक घराणीं प्राचीन कालापासून प्रसिद्ध होतीं व अद्यापहि आहेत. त्यांत **दिघे** वंशाचा समावेश होतो. ह्या घराण्याचा विस्तार, सांप्रत मुंबई इलाखा, मध्यप्रांत, सेंट्रल इंडिया वगैरे भागांत पसरलेला आहे. प्राचीन काळीं उत्तर हिंदुस्थानांत मांडवगड येथें हें घरा-

णें फार प्रसिद्धीस आलेलें होतें. त्यावेळीं मांडवगडाची राज्यसत्ता फार प्रबळ असून उज्जनीचे राजेहि तिचे मांडलीक होते. पुढें मांडवगडावर मुसलमानांनीं ज्या अनेक स्वाऱ्या केल्या. त्यांतील शेवटली स्वारी अल्लाउद्दिन खिलजी यानें सन १३०५ त केली. त्यावेळीं तेथें जो घनघोर रणसंग्राम झाला. त्यांत एकोणीस हजार प्रभु क्षत्रियांनीं जोहार* केल्याचें ब्रिग† साहेबानें आपल्या इतिहासांत नमूद केलेंच आहे. ह्या रणसंग्रामांत मांडवगडची राज्यसत्ता मुसलमानांच्या हस्तगत झाली, ते प्रजेवर जुलूम करूं लागले तेव्हां तेथील लोक स्वसंरक्षणार्थ जिकडे वाव मिळेल तिकडे निघून गेले, त्यापैकीं कांहीं दक्षिणेंत आले. त्यांत **दिघे** घराण्यांतील कांहीं कुटुंबें दक्षिणेंत आलीं. त्यांनीं आपलें वास्तव्य प्रथम सह्याद्रीपर्वतांत बऱ्याच अवघड ठिकाणीं केलें. व तेथून ते पुढें आपल्या उदरनिर्वाहार्थ निरनिराळ्या ठिकाणीं दक्षिणेंत गेले.

**या दिघे** घराण्यासंबंधीं कांहीं प्राचीन ऐतिहासिक माहिती उपलब्ध झाली तीः—राजपुतान्याच्या पूर्व भागास **दिघा** या नांवाचें हल्लीं खेडें आहे हें पूर्वीं मोठ्या प्रसिद्ध शहरांत गणलें जात असावें असें तेथील प्राचीन इमारतींचे पडके पाये, खिंडारें वगैरे दिसतात, त्यावरून प्राचीन इतिहाससंशोधकाचें मत आहे. दिघा हें गांव अगर शहर त्यावेळीं तालभोपाल येथील राजाच्या ताब्यांत होतें, व ह्या राज्यामध्यें प्रभुक्षत्रिय बऱ्याच प्रमुखत्वानें होते त्यांचेपैकीं,

---

* आणीबाणीच्या वेळी क्षत्रियलोक आपल्या बायकापोरांस ठार मारून नंतर शत्रू बरोबर सामना करण्यास सिद्ध होतात. त्यास “ जोहार ” असें म्हणण्याचा सांप्रदाय असे. जोहार हा शब्द जयहार याचेंच रूपांतर आहे.

† ब्रिग कृत माळव्याचा इतिहास भाग ४ था.

त्यावेळीं जे प्रभुलोक **दिघा** येथें रहात होते, त्यांस ह्या शहाराचें नांवावरून नांव पडलें असावें. पुढें **दिघा** याचें रूपांतर दिघे असें झालें असावें असें वाटतें. गांवावरून आडनावें प्रचारांत आलेलीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

ग्रामण्यासंबंधी जुनी माहिती उपलब्ध झाली आहे. त्यांत २१ पुरुषांची नांवें दिलीं आहेत, तीं:—१ मुकुंदप्रभु २ सिद्धप्रभु ३ गोपाळप्रभु ४ देवाजीप्रभु ५ धीरजप्रभु ६ वीरजप्रभु ७ नारायणप्रभु ८ हरजीप्रभु ९ बाळाजीप्रभु १० मणिशंकरप्रभु ११ विसाजीप्रभु १२ प्रेमजीप्रभु १३ हरिहरप्रभु १४ विश्वनाथप्रभु १५ प्रभाकरप्रभु १६ गोविंदप्रभु १७ शिवाजीप्रभु १८ माधवप्रभु १९ गोपाळप्रभु २० जिवाजीप्रभु २१ गोपाळप्रभु—याप्रमाणें ह्या **दिघे** घराण्यांतील पुरुषांचीं नांवें दिलेलीं आहेत. ह्या **दिघे** घरण्यांतील १९ साव्या पुरुषानें मांडवगड येथें अग्निहोत्राची दिक्षा घेतली. त्यावरून गोपाळप्रभुच्या वंशजांस पुढें **दिक्षित** हें उपनांव पडलें गेलें. तेव्हांपासून ह्या घराण्याच्या दोन शाखा झाल्या. त्यांत एकास **दिघे** व दुसऱ्यास **दिक्षित** या नावें संबोधूं लागले.

ह्या दोन्ही घराण्याचें गोत्र कृपाचार्य. प्रवरें अनुक्रमें आंगिरस, गौतम व शारद्वत ( औत्सर ) अशीं तीन आहेत. अश्वलायन शाखा व कात्यायनी सूत्र ह्याप्रमाणें धर्माधिकार परत्वें माहिती मिळते. तसेंच ह्या घरण्यांतील दोन्ही शाखांचीं आडनांवें–दिघे, दिक्षित, देशपांडे, कुळकर्णी, देशमुख, टिपणीस, कोतनिस, दप्तरदार, सिंधकर, चौककर, वगैरे हल्लीं प्रचारांत आहेत. ह्याच घराण्यांतील वंशज प्रख्यात **विठ्ठलराव देवाजी** उर्फ **काठेवाड दिवाणजी** हे गायकवाडींत स्वपराक्रमानें प्रसिद्धीस येऊन बडोदें येथें त्यानीं अग्निहोत्र यशस्वी केलें.

त्याचप्रमाणें त्यांनीं यज्ञहि* केला होता. या घराण्याची मुख्य देवता—**जननी देवी, खंडेराव** ( जेजूरीचा ) व **एकवीरा**, हीं आहेत. **श्रीजननीदेवीचें** मुख्य ठिकाण कुलाबा जिल्ह्यांत रोहें तालुक्यांत जननी नांवाचा डोंगर आहे, त्या डोंगरांत आहे. सदरहू देवीच्या देवळाचा जीर्णोद्धार इ. स. १८२८ त कै. श्री. **विठ्ठलराव देवाजी दिघे** यांनीं केला होता.

वरील ग्रामण्याच्या यादींतील शेवटचें नांव जें **गोपाळप्रभु** आहे त्याच्यापासून बारावा पुरुष **गोपाळप्रभु** हा **पाली** ऊर्फ **अमिनाबाद** येथील देशमुख होता. ह्या ठिकाणीं वतनावरून आपसांत कलह होऊन मारामाऱ्या झाल्या. त्यांत **गोपाळप्रभु** इ. स. १५६४ त मारिला गेला. त्यास दोन पुत्र होते तेः—१ मीठप्रभु व २ जोगदप्रभु. हे उभयतां वरील दंग्याच्या भीतिस्तव तेथून पळून गेले. ते अनुक्रमें **मीठप्रभु** मोसेखोरें येथें व **जोगदप्रभु** हे उंबरडी तर्फ निजापूर येथें येऊन राहिले. त्या प्रांतास मावळ असें ह्मणतात. मावळ ही संज्ञा पडण्याचें कारण असें कीं, **बहामनी राज्याच्या** मावळत्या दिशेचा ह्मणजे पश्चिमेकडील हा प्रांत असल्यामुळें, त्या भागांस मावळता प्रदेश हें नांव पडलें, व पुढें त्यांस मावळ हेंच नांव प्रचारांत आलें. ह्या मावळ प्रांताचे निरनिराळ्या डोंगराच्या रांगांनीं त्या प्रांताचे एकंदर बारा भाग झालेले आहेत. त्यांपैकीं सात भागांस मावळ असें ह्मणतात, व पांच भागास खोरें असें ह्मणतात. त्यांपैकीं मावळाचे सात भाग आहेत तेः— १ नाणें मावळ २ हिरडस मावळ ३ पवन मावळ ४ अंदर मावळ ५ गुंजाण मावळ

---

* ह्या यज्ञाची हकीगत आह्मीं प्रसिद्ध केलेले, ऐतिहासिक–जुने–लेख पु. ३ रें ग्रामण्याची संक्षिप्त माहिती व आज्ञापत्रें यांत सविस्तर दिली आहे, ती वाचकांनीं अवश्य वाचावी.

६ हिंजण मावळ व ७ कियांत मावळ व पांच खोरीं आहेत तीं १ मोसे खोरें २ मुठें खोरें ३ कानद खोरें ४ पौड खोरें व ५ रोहिड खोरें, याप्रमाणें नांवें आहेत.

**चांद्रसेनीय कास्यथ** प्रभु जे उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आले, ते प्रथम सह्यद्रिपर्वताच्या आश्रयानें राहून आपलें संरक्षण करून घेतलें, व नंतर उदरनिर्वाहार्थ योग्य संधी घेऊन जिकडे जशीं ज्यांची सोय झाली तिकडे ते गेले. परंतु तेथें जाण्यापूर्वीं बहुतेकांनीं आपलें वास्तव्य मावळ प्रांतांतच विशेषतः केलें होतें. त्यांत **दिघे** यांचे वास्तव्य विशेषतः खोऱ्यांत बरेंच होतें व अद्यापहि कित्येक वसाहती आहेत. त्यांनीं तेथें वसाहत केल्यानंतर स्वपराक्रमानें, कुळकर्ण, देशकुळकर्ण, देशमुख, देशपांडे वगैरे वतनें बहामनी राजांपासून संपादन केलीं. पुढें निजामशाहि, अदिलशाहि, कुतूबशाहि ( गोवळकोंडे ) वगैरे पादशाहींत या घराण्यांतील बरेच पुरुष आपले पराक्रम गाजवून प्रसिद्धीस आले. हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होतें.

" बाहामनी राज्यांत ज्यांस जशी सवड सांपडली, तशी त्यांनीं त्या भागांत देशमुखीं वतनें संपादन करून मावळ प्रांत वसाविला. मावळांतील या देशमुखांस मावळे म्हणतात. * * * त्यांच्या बाण्यावरून ते क्षत्रिय होते. हें निर्विवाद ठरतें. हे लोक चांगले घरंदाज, इभ्रतदार व वतनदार बरेचसे शिकलेले, व्यवहारचतुर व चांगले द्रव्यवान असे होते. ते आपल्या टापूपुरते स्वतंत्र कारभार करीत. त्यांच्या मदतीस बहुधा **प्रभु देशपांडे व कुळकर्णी** असत, ते कधीं कोणांस हार जात नसत. त्यांचें वीर्यतेज मोठें प्रखर होतें. ह्यावेळीं डोंगरी किल्ले मराठे लोकांकडे बादशहाकडून असत. कधीं कधीं देशमुख देशपांडे यांकडे असत. त्यांच्या संरक्षणार्थ, त्यांस फौज ठेविण्याकरितां व फौजेसहित आपल्या चाकरींत असावें म्हणून त्यांस जहागिरी,

इनामें. वतनें वगैरे देत असत. ह्याचप्रमाणें पुढें निजामशाहींत व अहिलशाहींत ही चाललें होतें. "*

**मीठप्रभु** हे मोसेखोरें येथें आल्यानंतर त्यांनीं स्वपराक्रमानें ८४ गांवाचें देशपांडे व कुळकर्णपणाचें वतन संपादन केलें. ह्याठिकाणीं **चरित्रनायकांच्या** पूर्वीं सहा पिढ्या हें वतन उपभोगीत होत्या, हें सोबत दिलेल्या वंशावळीवरून सिद्ध होतेंच.

दुसरें **जोगदप्रभु** हें उंबरडी तर्फ निजामपूर येथें येऊन राहिले. हें मागें दिलेंच आहे. उंबरडी हें ठिकाण पालीपासून सुमारें दहा कोसांवर डोंगरांत निसणीचे घांटाखालीं सह्याद्रिपर्वताच्या पायथ्याशीं आहे. त्यावेळीं तेथें कोळी राजाची राजधानी होती. त्याच्या आश्रयास **जोगदप्रभु** येऊन राहिला. यास चार पुत्र होते, तें सोबत दिलेल्या वंशावळीवरून समजेलच. त्या प्रत्येकांनीं निरनिराळ्या ठिकाणीं वतनें संपादन केलीं. तीं अनुक्रमें:—**भूतप्रभूनें** पौडखोरें येथील देशकुळकर्ण व गांवकुळकर्णाचें वतन संपादिलें. **अमराजीनें** मुठें खोरें येथील कुळकर्ण संपादिलें. **जैनप्रभुनें** कसबे पौड व नांदेडे येथील कुळकर्ण संपादिलें व **कुकप्रभु** हा कोंकणांत गेला. ह्या प्रमाणें **जोगदप्रभुच्या** पुत्रांची माहिती उपलब्ध झाली आहे. पुढें ह्या घराण्यांतील बरेंच पुरुष आपल्या परक्रमानें प्रसिद्धीस आलेले आहेत; परंतु त्यांच्या शाखेची माहिती येथें देणें इष्ट नसल्यामुळें ती दिली नाहीं, तरी त्यांची माहिती यथाकाळीं देण्यांत येईल.

---

* सरदेसाईकृत मराठी रियासत पा. १६६–१६७.

# भाग २ रा.

## बाळपण व तत्कालीन परिस्थिति.

या दिघे देशपांडे घराण्यांतील जीं कित्येक **नर-रत्नें** बहामनी राज्यांत व त्यानंतर त्याचे विभागांत, आपल्या मर्दुमकीनें व मुत्सद्दीगिरीनें प्रसिद्धीस आलीं. त्यांचा पुढें निजामशाहीच्या अखेरीस मोगलांच्या अफाट सेना-समूहाबरोबर टिकाव लागला नाहीं, हें जरी खरें होतें, तरी त्यावेळीं त्यांस कोणाच्या तर्फेनें लढावें, ह्याचीच शंका त्यांस बहुशा कारणीभूत झाली होती. त्यामुळें त्यांस कांहीं काळ सह्याद्रीच्या खोऱ्यांत स्वस्थ बसावें लागलें होतें. तथापि राखेंत दडपलेली इंगळी जशी उघडी होतांच आपलें प्रखर तेज वाऱ्या-बरोबर फाकूं लागते,त्याप्रमाणेंच ह्या वीरांस वाव मिळतांच त्यांनीं आपलें क्षात्र-तेज प्रगट करून, आपलें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें. पुढें त्यापैकीं कित्येक **शहाजीराजे भोसले** यांचे आमदानींत उदयास आले आहेत. अस्तु !

पहिल्या भागांत निर्देशिल्याप्रमाणें **मीठप्रभूनें** ८४ गावाचें वतन स्वपराक्रमानें संपादिलें, त्यावरून पहातां हा पुरुष पराक्रमी असावा, हें निश्चित होतें. त्याचे पश्चात त्याचा मुलगा **कानप्रभु** हा वडिलांच्या वतनाची व्यवस्था मर्यादित ठेऊन होता. व त्याचप्रमाणें पुढील दोन पिढ्या आपल्या वतनाचें संरक्षण करून व योग्य वेळीं आपल्या शत्रूंस आपल्या पराक्रमाची

जाणीव करून देत होते. ह्याप्रमाणें सारख्या तीन पिढ्या इतक्या मोठ्या वतनाचा उपभोग घेत असल्यामुळें, तशांत मावळांतील प्रदेशहि नेहमींच सुपीक तेणेंकरून हें घराणें त्या काळीं चांगलेंच धनवान होतें, हें सांगणें नकोच. ह्या सुप्रसिद्ध घराण्यांत **चरित्रनायकाचा** जन्म शके १५३७ (सन १६१५) त झाला.

बालकाचे पाय पाळण्यांत दिसतात, अशी ह्मण आहे. त्याप्रमाणेंच **चरित्रनायक** पुढें प्रसिद्ध पुरुष होणार, असें त्यांचे घराण्यांतील वडील मनुष्यांस त्याच्या लहानपणापासून वाटत असे, ते जसजसे मोठे होऊं लागले, तसतसे त्यांच्या प्रत्येक लीला मोठ्या अवर्णनीय असत. त्यांस त्या काळानुसार शिक्षणहि मिळालें होतें. प्राधान्येंकरून त्यावेळच्या युद्धकलेचेंहि शिक्षण मिळालें होतें. त्यांत तर त्यांनीं चांगलेंच प्राविण्य मिळविलें. दांडपट्टा खेळणें, घोड्यावर बसून तीरंदाजी व निशाण मारणें, हें त्यांस चांगलेंच अवगत झालें होतें. ते शरीरानें उंच, बांधा सदृढ असून त्यांचा चेहरा प्रफुल्लीत असा होता. त्यावेळीं मावळ प्रांतावर विशेषतः मुसलमानी राजाचा अम्मल असल्यामुळें, त्या भाषेचा बराच प्रसार झालेला होता. **चरित्रनायकांस** ह्या भाषेचें ज्ञान चांगलेंच झालें असल्याकारणानें, ते फकिराचे दोहरे वगैरे बोलूं लागल्यास, हे कोणीतरी अवलीया ( फकीर ) आहेत असें ऐकणारांस वाटे. तशांत त्यांच्या वाणींत मधुरता असल्यामुळें प्रतिपक्षांवर छाप तेव्हांच बसे.

बहामनी राज्य मोडून त्याचे पांच भाग झाले. त्यांत मावळाप्रांताचा उत्तरेकडील कांहीं भाग निजामशाहीच्या वाट्यांस आला होता, व कांहीं दक्षिणेकडील भाग अदिलशाहींत गेला होता. तत्कालीन महाराष्ट्राची परिस्थिती ह्मटली ह्मणजे, मोगलांची, निजामशाही

बुडविण्याची जणूकाय प्रतिज्ञाच असल्यामुळें, तेथील स्थिती फारच शोचनीय झाली होती. कोणत्यावेळीं हल्ला येईल, लूट होईल, बलात्कार होतील, अगर घरेंदारें उध्वस्त होतील याचा भरंवसा नव्हता. मोगलाखेरीज या मावळ प्रांतावर जंजिऱ्याच्या शिद्दीनें लुटण्याचा सपाटा चालू केला होता. अशा स्थितींत ह्या डोंगराळ प्रांतांत तेथील देशमुख, देशपांडे यांनींच स्वपराक्रमानें आपलें संरक्षण केलें. अशी परिस्थिति असल्यामुळें **चरित्रनायकांस** लहानपणापासून वडील मंडळीच्या शौर्याच्या व पराक्रमाच्या गोष्टी ऐकिण्यांत व पहाण्यांत येत असत.

चांदबिबीच्या कारकिर्दींत निजामशाहीच्या प्रजेस बऱ्याच शांततेनें नांदावयास मिळालें. त्यावेळीं चांदबिबीसहि ह्या मावळ्यांनीं बरींच मदत केली होती. तिच्या पश्चात पुन्हा निजामशाहींत धामधूम सुरू झाली; परंतु थोडक्याच अवधींत निजामशाहीचे हितकर्ते मलिकंबर, लुखजी जाधव व मालोजीराजे भोसले, ह्यांनीं आपल्या पराक्रमानें, बुद्धीचातुर्यानें व संगनमतानें मोगलापासून सन १६२० पर्यंत निजामशाहीचें रक्षण केलें. सन १६१९ त **मालोजीराजे भोसले** मरण पावले. त्यांचा सर्व अधिकार त्यांचा मुलगा **शहाजीराजे** यांस मिळाला. त्यावेळीं निजामशाहीकडून मालोजीराजे याच्या फौजेच्या खर्चाकरितां पुणा, नासीक, अहमदनगर व खानदेश ह्या प्रांतांतील मुलूख होता. त्यांत पुणें प्रांतांतील मुलखाची जहागिरी मावळांतील असल्यामुळें भोसले घराण्याचा व ह्या देशपांडे मंडळीचा बराच परिचय झालेला होता. तोच पुढें फलद्रुप झाला. हें निराळें सांगावयास नकोच.

इ. स. १६२१ त लुखजी जाधवराव मोगलांस जाऊन मिळाला, त्यावेळीं निजामशाहीच्या तक्तावर अज्ञान मुलगा असल्यामुळें, तेथील कित्येक स्वार्थी सरदार प्रबळ होऊन आजूबाजूच्या मुलखांत लुटालूट करीत असत. त्याचप्र-

माणें कोंकणप्रांती जंजिऱ्याचा सिद्दी प्रबळ होऊन लुटालूट करूं लागला होता. ह्यामुळें ह्या मावळ प्रांतावर वारंवार शत्रूपासून होणाऱ्या स्वाऱ्यांचा बंदोबस्त करण्यास हे मावळे स्वतः सिद्ध असत. ह्यावेळीं चरित्रनायकांचे वडील **मालोजी राजे** यांचे पथकांत मावळांतील जहांगिरीच्या बंदोबस्ताकरितां होते. पुढें ते शहाजीराजे यांचे पथकांत होते.

इ. स. १६२१ ते १६२६ पर्यंत मालिकंबर व शहाजीराजे या उभयतांनीं आपल्या अतुल पराक्रमानें व बुद्धी चातुर्यानें निजामशाहीचें संरक्षण केलें. त्यावेळीं मावळांतील देशपांडे, यांनीं मोंगलाबरोबर अनेक लढाया मारल्यामुळें निजामशाहींतून त्यांस वंशपरंपरें वतनें मिळालेलीं आहेत. खुद्द औरंगजेब दक्षिण सुभ्यावर असतांना, पौडखोरें व मोसेखोरें येथील देशपांडे यांनीं निकरानें हल्ले करून त्यांस नामोहरम केलें होतें. ह्या त्यांच्या पराक्रमाचें पारितोषक ह्मणून कित्येकांस देसाईपणाचे हक्क मिळाल्याबद्दल मलिकंबरांच्या वेळच्या सनदा अद्याप असल्याचें कळतें. ह्यावरून पहातां **चरित्रनायकां**च्या पूर्वजांनीं अनेक प्रसंगीं लढाया मारून, आपला, पराक्रम गाजविला होता. सन १६२६ त मलिकंबर मरण पावला, तेव्हां एकट्या **शहाजीराजे** यांनीं कांहीं काळ निजामशाहीचें संरक्षण केलें, तेणेंकरून त्यांची कीर्ती ह्या महाराष्ट्रांत अजरामर राहिली. परंतु पुढें त्यांच्या दुर्दैवानें त्यांस त्यावेळीं यश आलें नाहीं. त्यामुळें त्यांनीं थोडक्याच दिवसांत निजामशाहीचा त्याग करून परिंडाच्या किल्ल्यांत राहून स्वातंत्र्याची मोहीम उभारली. त्यावेळीं त्यांस विशेषतः ह्या देशपांड्यांचाच पाठींबा होता. त्यावेळीं मोंगलासारखा प्रबळ शत्रू त्याचें पारिपत्यास

नसता तर मराठेशाही तेव्हांच स्थापन झाली असती. परंतु हें महत्कार्य त्यावेळीं त्याचेकडून घडलें गेलें नाहीं, तरी त्याचा लाभ त्यांच्या महाप्रतापी पुत्रांस मिळाला. हें निराळें सांगावयास नकोच.

**चरित्रनायकाच्या** जन्मापासून ह्या महाराष्ट्रांत अनेक क्रांत्या घडून आल्या. त्यामुळें त्यांस त्यांचे अल्प वयापासून लढाई म्हणजे काय, शत्रूवर हल्ले कसे चढवावे, गनिमीकावे कसे लढवावे, शत्रूंस जेरीस कसा आणावा, ह्यांचें योग्य ज्ञान त्यांचे वडील मंडळींकडून मिळालें होतें. अर्थांत हा काळ म्हटला म्हणजे मारूं कीं मरूं. हाच प्रतिध्वनी होत असे. शत्रूस पाठ दाखवून परत येत असे, त्याची अवहेलना होत असे, त्यामुळें ते आपल्या • प्राणाची पर्वा केव्हांही करीत नसत, म्हणून त्यांच्या कीर्तिध्वजा इतिहासांत चिरंतन आहेत.

**शहाजीराजे** यांचें सर्व प्रयत्न निर्फळ झाल्यानंतर निरुपायास्तव त्यांस विजापुराकडे नोकरींत जावें लागलें. ते. इ. स. १६३६ त विजापुरास गेले त्यावेळीं **जिजाबाईसाहेब व शिवाजीमहाराज** यासहि बरोबर घेऊन गेले. **शहाजीराजे** यांनीं विजापुराकडे नोकरीस राहण्यांचें कबूल केलें, त्यावेळीं त्यांचीं पुणें प्रांताची जहागिरी, जी मोगलाबरोबर झालेल्या तहांत विजापुरकराकडे गेली होती, ती त्यानें **शहाजीराजे** यांस परत दिली. त्या जहागिरीची व्यवस्था पहाण्याकरितां आपले विश्वासांतील दोन इसम ठेविले, ते एक दादोजी कोंडदेव यांस सुभेदार नेमिलें, दुसरा **अनंतप्रभु फणसे** व जहागिरीच्या बंदोबस्ताकरितां एक हजार सैन्य ठेविलें. त्याजवर सैय्यद बांडा हा मुख्य होता. **अनंतप्रभु फणसे** हा **शहाजीराजे** यांचे पदरीं उत्तम हिशेब लिहिणारा

होता. सुमारें दोन वर्षें **शहाजीराजे** विजापुरास राहिले. नंतर त्यांस कर्नाटकांत पाळेगारांच्या बंदोबस्ताकरितां जावें लागल्यामुळें, **जिजाबाई व शिवाजी** यांस आपल्या जहागिरीवर पुण्यास पाठविलें. **शहाजीराजे** सन १६४० त परत विजापुरास आले. त्यावेळीं हीं मातापुत्र पुन्हां विजापुरास गेलीं. तेथून तीं परत सन १६४३ च्या सुमाराम आलीं.

मोंगलाबरोबर अदिलशहाचा सन १६३६ त तह झाला. त्यावेळीं मावळप्रांत अदिलशहाच्या ताब्यांत गेला. तेव्हां तेथील देशमुख देशपांडे, अदिलशहाचें अंकित झाले. त्यांस त्यांच्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां अदिलशहाकडून नेमणूकाहि मिळाल्या, तत्रापि हे देशमुख देशपांडे आपल्या मुलखाची व्यवस्था स्वतंत्रपणेंच करूं लागले. ह्यावेळीं **चरित्रनायकाचे पदरीं** कोंकणें व मावळे मिळून पांचशें लोकांचे सैन्य होतें. त्यांच्या खर्चाकरितां अदिलशहाकडून कांहीं मुलखही मिळाला होता. असें असतांहि **चरित्रनायक** स्वधर्मसंरक्षणार्थ व स्वराज्य स्थापण्याकरितां **शिवाजीमहाराजांच्या** राजकारणांत स्वयंस्फूर्तीनें येऊन मिळाले. त्याची हकीगत पुढील भागांत देण्यांत येईल.

# भाग ३ रा.

## स्वराज्यसेवा.

मागील भागांत **शिवाजीमहाराज** विजापूरास गेले, हें निदर्शिलेंच आहे. तेथें असतांना त्यांनीं यवनांचीं नीच कृत्यें प्रत्यक्ष पाहून, त्यांच्या ओजस्वी बाण्यास ती त्यांची कृति सहन झाली नाहीं. तेव्हांपासूनच आपण यवनाचें दास्यत्व कधींहि पत्करणार नाहीं. असा त्या बालवयांत त्यांनीं निश्चय केला. सन १६४३ त **शिवाजीमहाराज** विजापुराहून पुण्यास परत आल्यावर आपल्या वडिलांनीं जहागिरीच्या व्यवस्थेकरितां ठेविलेल्या मंडळींपैकीं, **रघुनाथ बल्लाळ कोर्डे सोनोपंत डबीर** वगैरे जे आपणांस सहाय्य झाले, ते व आपले बाळमित्र **येसाजी कंक, तानाजी मालुसरे, दादजी बापुजी, चिमणाजी बापुजी देशपांडे** वगैरेबरोबर संगनमतकरून स्वराज्य स्थापण्याकरितां निरनिराळीं राजकारणें करूं लागले. तेव्हां त्यांहिं प्रथम जें कार्य आरंभिलें तें डोंगरी पहाडांतून रात्रंदिवस हिंडावें, तेथील लोकमतांचें निरीक्षण करावें, स्वराज्य स्थापण्यास जे आपणांस सहाय्य होण्यास अनुकूल असतील, त्यांस आपल्या राजकारणांत घ्यावें. हा क्रम सुमारें दोन वर्षें चालवून, पुढें स्वातंत्र्याची मोहीम इ. स. १६४३ त सुरु केली. त्यावेळीं **शहाजीराजे** यांनीं स्वराज्य स्थापण्याचें राजकारण केलें होतें, त्याचा विसर मावळांतील लोकांस हा वेळपर्यंत पडला नव्हता. अर्थात **शिवाजी** हा **शहाजीराजे** ह्या महाप्रतापी पुरुषाचा मुलगा आहे, हें जाणून आसपासचे प्रांतांतील देशमुख, देशपांडे वगैरे घराण्यांतील **अनेक जवानमर्द**

तरूण वीर स्वातंत्र्याकरितां स्वयंस्फूर्तीनें . त्यांच्या राजकरणांत येऊन मिळूं लागले.

ह्या वेळीं **चरित्रनायक** विजपुरकरातर्फे मावळ खोऱ्याचे बंदोबस्ताकरितां मावळे व कोकणें मिळून पांचशें लोकांच्या पथकासह होते, हें मागें दर्शविलेंच आहे. त्यांस **शिवाजीची** स्वराज्य स्थापण्याची चालू झालेली मोहीम कळतांच सन १६४५ त त्यांनीं परतंत्र्याचे पाश झुगारून देऊन ह्या राजकारणांत ते आपल्या परिवारासह येऊन मिळाले. इतक्या परिवारासह **चरित्रनायक** स्वयंस्फूर्तीनें येऊन मिळाले, याबद्दल **शिवाजीमहाराजांस** अत्यंत आनंद होणें स्वाभाविकच आहे. व लवकरच आपल्याला स्वातंत्र्याची कालक्रमणा करण्याची सुसंधी लाधेल अशी त्यांस आशा वाटूं लागली. त्यावेळीं **चरित्रनायकाचा** शिवाजीनें योग्य सन्मान करून, आपल्या राजकारणांत त्यांस घेतलें. **चरित्र-नायक** हे विजापूरकरांतर्फे मावळ खोऱ्याच्या संरक्षणार्थ होते, हें वर दिलेंच आहे. त्यामुळें त्यांस तेथील डोंगरांतील चांगलीच माहिती होती, तेव्हां त्यांनीं प्रथम जें कार्य पत्करिलें, तें डोंगरी किल्ल्यांच्या चोरवाटांची पहाणी करणें, व किल्यांतील अधिकाऱ्यांस अनुकूल करून घेणें. हें होय! जे थोर पुरुष असतात ते अनेक गुणानें प्रेरित असतात, ह्मणूनच ते आपल्या प्रखर तेजानें दुसऱ्यांस दिप-वितात. त्याचप्रमाणें **चरिनायकाचें** अंगीं जे अनेक गुण होते. त्यांत मोठा मह-त्वाचा गुण होता तो हा कीं, मुत्सद्दी पेंच लढवून शत्रूस जेरीस कसा आणावा, व आपलें इष्ट कार्य साध्य कसें करून घ्यावें. ह्या त्यांच्या विशिष्ट गुणामुळें, त्यांस आपल्या प्रांतांतील, अनेकांस आपलें सहकारी करितां आलें. ह्या त्यांच्या विशिष्ट गुणामुळें महाराजांची थोडक्याच अवधींत बहाल मर्जी बसून त्यांच्या अनेक शौर्याच्या व मुत्सद्दीपणाच्या कृत्यामुळें त्याजवर पूर्ण विश्वास बसला; ह्मणूनच **शिवाजीनें** आपल्या खाजगी मंडळींत त्यांची नेमणूक केली, हें पुढील माहिती-वरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

**चरित्रनायक** शिवाजीच्या राजकारणांत येऊन मिळाल्यानंतर थोडक्याच दिवसांत रोहीड खोऱ्यांतील कुळकर्ण्यांचा मुलगा **दादजी नरसप्रभु** हाहि शिवाजीबरोबर स्वराज्याची शपथ घेऊन त्यांच्या राजकारणांत स्वयंस्फूर्तीनें येऊन मिळाला. हें वर्तमान विजापूर दरबारीं बांदल देशमुख, खोपडे व जेधे देशमुख वगैरेंनीं कळविलें. तेव्हां विजापूराहून **दादजी नरसप्रभु** यांचे वडीलांस आपला मुलगा **शिवाजी**च्या राजकारणांत मिळाला आहे. त्यास त्यापासून परावृत्त करावें, म्हणून धमकीचें पत्र आलें. त्यावेळीं **नरसीबावा** फारच हवालदील झाला. व आतां आपळें पारिपत्य अदिलशहा खास करणार, असें त्यांस वाटलें. ही हकिकत **शिवाजीस** कळली. त्यावरून **शिवाजीनें दादजी नरसप्रभुस** शके १५६७ वैशाख शुद्ध १ चें पत्र लिहिलें तें:—( रा. खं. १५ पृ. २६८ )

" तुम्हांस मेहरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणें सिरवलाहून अभिमानी तुम्हाकडे पाठविला त्याजवरून तुमचे बाप नरसिबावा हवालदिल झाले, वगैरे कितेक बहुतेक लि ॥ त्यास शाहासी बेमानगिरी तुह्मीं व आम्हीं करीत नाही श्री रोहिरेश्वर तुमचे खोरी यांतील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीं लगत स्वयंभू आहे. त्यांनीं आह्मांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे त्यांस बावास हवाल होऊं नये खामाखा सांगावा आणि तुह्मीं तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें राजश्री श्रीदादजीपंताचें वियमानें बावाचें व तुमचें व आमचें श्रीपासीं इमान जाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आह्मीं व आमचे वंशज लेकराचें लेकरीं वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाहीं हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे याप्रमाणें बावाचे मनाची खातरी करून तुह्मीं येणें " वरीलप्रमाणें शिवाजींचें आश्वासन, व मोठें बोधपर पत्र दादजी नरसप्रभु यांस आलें.

वरील पत्र **दादजीस** आल्यानंतर सुमारें एक महिन्यानें म्हणजे शके १५६७ जेष्ठ वद्य २ चें पत्र विजापुरकरांकडून आलें, तें (रा. खं. १५ पृ. २६९) " खुदावंत शाह गाजी हुकमत पन्हा याचे हुकूमानें मेहेरबां वजीराचा हाकाम तुमचे नांवे आला त्यांत मजमून अज रखतखाने सीवाजी राजे यासि पुंडावास तुम्ही मिळताव होऊन रोहिरेश्वर पहाडी तुमचे खोरीत हजार बारासे जमाव तुम्ही लोकी केला ये बाब राजे म॥रनिल्हे याणी तुम्हांस खत प ॥ त्यात इमानभाग जाल्याचा फिसाती मतलप छ २९ सफर कलमा केला आहे हे खबर बांदल देशमुख व खोपडे व जेधे देशमुखी ठाणे सिरवली जाहीर केली हे कळून फरारी जालास हरदु सेरीची विलयत वैरण जाली मोकदमे हाली हुजूरचे मेहरबानगी वरून कौलनामा फरमाविला असे तरी तुम्ही रयात व पटवारी व बाजे वतनदार याजला कचेबचेनशी आपले मकानी हरदु तापियास येऊन हजर होणे आणि दो हि खोरीची विलायतची संचणी आबादानी करून दिवाण देणे व तुमची जमिदारी हककानु इनामति इसाफतिसी कद बमोजीब येणे दरबाब हरएक मतलब तकसीर केली ती तुम्हास मुबाहक याचे हुकुमावरून जाली असे दरबाब हरगीज दिवाणांतून इजा होणार नाहीं " याप्रमाणें विजापूरच्या दरबारांतून **दादजीनें** शिवाजीच्या राजकारणांतून परावृत्त व्हावें म्हणून मोठ्या गौरवाचें तर खरेंच परंतु मुत्सद्दिरीचें पत्र आलें होतें यांत शंकाच नाहीं.

वरील पत्र **दादजी नरस प्रभुला** जितक्या मुत्सद्दिरीचें आलें, त्याच्या उलट दादजीच्या वडिलांस विजापूरच्या दरबारांतून आलें होतें. कारण **नरसीबावा** हे विजापूरकरांचे नोकर होते. अर्थांत त्यांस विजापूरकरांनीं धाक दपटशा देऊन मुलांस **शिवाजीच्या** राजकारणांतून परावृत करावें, म्हणून ते धमकीचें पत्र आलें असावें, हें **शिवाजीनें दादजीस** लिहिलेल्या पत्रावरून

उघड होतें.परंतु त्यावेळीं महाराष्ट्रांतील हिंदुंची परिस्थिती बरीच अधोगतीस गेलेली होती. त्यांस स्वतःच्या परवशतेची चांगलीच जाणीव होऊन त्यांच्यांत स्वातंत्र्याची प्रेरणा उत्तम झालेली होती. त्यावेळीं स्वदेशाकरितां, स्वधर्माकरितां व स्वातंत्र्याकरितां, आपला देह अर्पण करण्याकरितां, अनेक मावळ्यांचीं मनें स्वयंस्फूर्तीनें तयार होतीं. त्या वेळीं मी किंवा माझें कुटूंब एवढेंच माझ्या कर्तव्याचें क्षेत्र नसून माझा देश, त्या देशाच्या, प्रगतीच्या मार्गांत आडव्या येणाऱ्या अडचणींचा नाश करणें हें माझें आद्य व परम कर्तव्य आहे. अशी त्यावेळीं मावळ्यांचीं वृति संचारून गेली होतीं. त्याप्रमाणें ते कृति करूं लागले. ह्या गोष्टींची अद्याप प्रत्यंतरें पहावयास मिळतात. ह्या गोष्टी पौराणिक नाहींत.

" परंतु मावळ्यांच्या साह्यानें श्रीशिवाजीमहारजांनीं मराठी राज्याची स्यापना केली ती मात्र आतां पौराणिक होऊं शकत नाहीं. " अशा जोमानें जे मावळे आपल्या देशाला पारतंत्र्यांतून काढून स्वातंत्रेच्या व स्वधर्माच्या उदात्त हेतुनें प्रेरित झालेले ते विजापूरकरांच्या धाकदपटशास कितीसें महत्व देणार ? असो. ह्यावेळीं विजापूरचा बादशहा अहमदशहा अदिलशहा होता. मुसलमानांच्या धर्मच्छाळामुळें सर्व प्रजा संत्रस्त झाली होती. हिंदु राजांची भंगलेलीं सिंहासनें व उध्वस्त झालेलीं देवालयें, यवनी राज्याच्या जुलमाची व बेफामपणाची साक्ष पटवीत होतीं. मुसलमान सरदारांनीं जबरदस्तीनें आपल्या जनानखान्यांत ओढून नेलेल्या हिंदुस्त्रिया, त्यांचें पातिव्रत्य भंग झालेलें पाहून, त्या सैतानांची आपल्या क्रोधाग्नींत राखरांगोळी करून टाकण्याविषयीं कारस्थानें, कित्येक स्वाभिमानी हिंदु सरदारांकडून चालू झालेलीं होतीं, व हिंदु राज्या-

ची पुनः स्थापना झाल्याशिवाय आपल्या गुणांचें चीज होणार नाहीं. अशा विचारांनीं त्यांच्या मनांत काहूर उसळून गेलें होतें. त्यावेळीं परतंत्राचे, इतके भयंकर व अनर्थक परिणाम होत असल्यामुळेंच परतंत्रतेच्या दाबांत सडत असलेल्या लोकांनीं तिच्या कचाटांतून सुटून जाण्यासाठीं मृत्यूला देखील आनंदानें व उल्हासानें कवटाळण्यांस सिद्ध व्हावें, किंवा स्वातंत्र्य संपादनार्थ स्वतःच्या जीवितावरही पाणी सोडण्यास उद्युक्त व्हावें, त्यांत नवल तें काय ? पारतंत्र्याचे पाश झुगारून देऊन स्वतःस स्वातंत्र्याची जोड करून घेण्याकरितां निरनिराळ्या लोकांनीं केलेल्या दीर्घ, घनघोर व तुंबळ प्रयत्नांचें दाखले जगाच्या इतिहासांत अनेक नमूद आहेत, त्याचप्रमाणें सतराव्या शतकांत मावळ्यांनीं शिवाजीबरोबर चालू केलेलें राजकारण हें त्यापैकींच एक आहे." ( केसरी ता. २८-४-९६ )

वर नमूद केल्याप्रमाणें शिवाजीबरोबर राजकारणांत अनेक तरुण दाखल झाले. त्यांचा जोम वाढूं लागला. यावेळीं पुण्याच्या सुभ्याची व्यवस्था सुभेदार दादोजी कोंडदेव हा पहात असे. सुभेदार ह्या परगण्याचा वसूल नियमीत खर्चापुरता ठेवून बाकी सर्व शहाजीराजे यांजकडे पोहोंचता करीत असे. त्यामुळें शिवाजीस ह्यावेळीं त्यांच्या राजकारणाच्या वाढत्या खर्चास लागणाऱ्या द्रव्याची मदत **चरित्रनायक** वेळोवेळीं करीत असे. अशा अनेक प्रकारें शिवाजीस साह्य मिळाल्यामुळें थोडक्याच अवधींत विजापुरकरांच्या तोरणा किल्ल्यास मराठ्यांचें तोरण बांधलें गेलें.

हा काळ ह्मणजे मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीचा उषःकाळ ! अर्थात प्रभातकाळच्या कोंवळ्या व सुवर्णमय किरणांप्रमाणें मनाची उल्हासित वृत्ति करणारा असा होता. ज्याप्रमाणें दिनमणीच्या माध्यान्हकाळच्या तेजोमय

किरणांपेक्षां प्रभातकालचें आरक्त व बालकिरण मनांत ज्यास्त आनंद, उल्हास व उमेद उत्पन्न करितात, त्याचप्रमाणें किल्ला काबीज करून स्वराज्याचें तोरण बांधिलें, तेव्हांपासून त्यांस पुढील प्रयत्नास उत्तेजन मिळालें. त्यांच्या राजकारणांत अनेक जवानमर्द मराठे वीर आपल्या शुद्ध व सतेज बुद्धीनें येऊन दाखल होऊं लागले. ह्यावेळीं विजापूरदरबारीं स्वराज हितचिंतक व मुत्सद्दी यांचा बराच अभाव असून स्वार्थी व कमकुवतांचें कूपमंडळ झालें होतें. त्यामुळें ह्या प्रांताचा योग्य बंदोबस्त करण्याकडे दुर्लक्षच होतें. वास्तविक पहातां हा प्रांत मोगलांचा होता. आदिलशहाकडून त्याचा बंदोबस्त झाला नाहीं, तरी तो मोगलानें करणें वाजवी होतें. परंतु मोगलांनीं आपल्या राजधानीपासून अती लांब व अवाढव्य मुलूख काबीज केला असल्यामुळें, त्यांस त्याचा योग्य बंदोबस्त करणें अशक्य झालें होतें. याचें कारण असें कीं, सन १६४४ त **शहाजहानानें** औरंगजेबास दक्षिणच्या सुभ्यावरून काढून गुजराथच्या सुभ्यावर पाठविलें. त्यानंतर अनुक्रमें खानडौरान यांस एक वर्ष, जयसिंग दोन वर्षें, शहाजवानखान यांस थोडे दिवस, पुढें मुरादबक्ष, व इ. स. १६४९ ते १६५२ पर्यंत शाहिस्तेखान, नंतर औरंगजेब, याप्रमाणें मोगलांचे दक्षिणेंतील अनेक सुभेदार झाले, त्यांस आपल्या डामडौलाखेरीज, दक्षिणच्या सुभ्याचा बंदोबस्त करितां आला नाहीं. अशी परिस्थिती असल्यामुळें, **शिवाजीस** मोगलापासून या अवधींत मुळींच त्रास झाला नाहीं, व त्यांनींहि मोगलांच्या मुलुखांत उपद्रव देण्याचा प्रयत्न केला नाहीं; परंतु मोगलांचे कित्येक किल्लेदार, बळकावून बसलेले किल्ले, आपण होऊन **शिवाजीचे** स्वाधीन करून, स्वतः त्यांचें आधिपत्य पत्करूं लागले. त्यामुळें थोडक्याच अवधींत **शिवाजीच्या** मुलुखाचा विस्तार फारच वाढला. अर्थात विजापुरकरांचा वसूल दक्षिणेंतून जाण्याचा दिवसेंदिवस कमींच होत चालला. त्यामुळें विजापुरदरबारी फारच गडबड उडाली.

ह्यावेळीं **शहाजीराजे** कर्नाटकांत विजापुरकरांचे तर्फे जरी होते, तरी तेथील व्यवस्था ते स्वतंत्रपणानेंच करीत असत. त्यावरून त्यांची अपाल्या मुलांस ह्या कृत्यास मदत आहे, असें कित्येक दरबारच्या मंडळीनें सांगितल्यावरून आदिलशहास, शहाजीराजे यांचा फार संताप येऊन. त्यांनीं, एक धमकीचें पत्र पाठविलें, त्यांत स्पष्ट लिहीलें होतें कीं, "आमचा मुलूख काबीज करण्यास तुह्मीं आपल्या मुलांस आंतून मदत करितां, असें आम्हांस खात्रीनें कळलें आहे. तरी त्या गोष्टीचा नीट विचार करून आपल्या मुलाचा बंदोबस्त करवा, नाहींतर आह्मीं तुमचें व तुमच्या मुलाचें पारिपत्य करूं." ह्या पत्राचा जबाब **शहाजीराजे** यांनीं अदिलशहास पाठविला. त्यांत त्यांनीं स्पष्ट दर्शविलें कीं, माझ्या मुलाच्या, ह्या कृत्याशीं माझा बिलकूल संबंध नाहीं. इतकेंच नव्हे, तर, मुलगा माझें मुळींच ऐकत नाहीं, करितां खावंदानेंच त्याचा बंदोबस्त करावा. शहाजीनें आदिलशहास उत्तर पाठविलें, त्याचवेळीं दादोजी कोंडदेवास आपल्या मुलाचा बंदोबस्त करण्याकरितां पत्र लिहिलें, दादोजीनें **शिवाजीची** ह्या कृत्याबद्दल, कानउघडणी करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. असें कांहीं बखरींत लिहिलें आहे. परंतु त्यांत कांहीं तथ्य नसावेसें वाटतें. पुढें दादोजी अजारीं पडून सन. १६४७ त मरण पावला.

वर निर्देष्टिल्याप्रमाणें अदिलशहाला **शहाजीचें** म्हणणें अमान्य झालें. हें पुढील त्याच्या कृत्यावरून सिद्ध होतें. **शिवाजीस**, त्याच्या बापाची मदत आहे. ह्मणूनच त्यानें ही पुंडाई चालविली आहे हाच त्याचा ग्रह कायम झाला. अर्थात **शहाजीचा** बंदोबस्त केल्यावांचून **शिवाजीची** पुंडाई थांबणार नाहीं. असा ग्रह कायम ठेवून अदिलशाहानें आपला कर्नाटकांतील सरदार बाजी घोरपडे होता. त्यास **शहाजीस** पकडण्याबद्दल गुप्त हुकूम पाठविला. त्याप्रमाणें त्यानीं

**शहाजी**स दग्यानें पकडून विजापूरास नेलें. तेथें त्यांस आदिलशहानें कैद केलें. ते सन १६४९ पासून १६५३ पर्यंत कैदेंत होते. त्यांची कैदेतून सुटका **शिवाजी**नें मोगलामार्फत करविली. **शहाजीराजे** कैदेंत असे पर्यंत **शिवाजी**नें विजापूरकरांच्या मुलुखांत उपद्रव दिला नव्हता, परंतु वडिलांची सुटका झाल्या नंतर त्यांनीं विजापूरकरांच्या प्रांतीं हल्ले चढविण्याचें निशाण उभारिलें.

ह्यावेळीं **शिवाजी**स विजापुरच्या दोन सरदारांपासून फार आडथळे होत असत, तेः—एक मोरे व दुसरा बांदलदेशमुख. हे दोघे सरदार जरी विजापुरकरांचें होते, तरी ते स्वतंत्रच वागत असत. ह्या दोघांस **शिवाजी**नें आपले अंकित व्हावे, म्हणून सामोपचारानें कळविलें होतें, परंतु तें त्यांनीं मान्य केलें नाहीं, तेव्हां त्याजवर हल्ले चढवून त्यांचा सर्व मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. हे दोन्ही प्रांत शिवाजीच्या ताब्यांत आल्यामुळें बहुतेक मावळ व घांटमाथा ताब्यांत आला इतकच नव्हे तर, मराठी राज्याची सीमा इतकी मोठी झाली कीं ती विजापूरकरांच्या सरहद्दीस जाऊन भिडली. अर्थात मध्यें शत्रूंपासून अडथळा होणें राहिला नाहीं. ह्याच सुमारास विजापुरचा अहमदशहा अदिलशहा सुमारें वर्षभर अजारी होता तो ता. १५ नोव्हेंबर सन १६५६ त मरण पावला. तेव्हां त्याचा अज्ञान मुलगा अल्लीआदिलशहा तक्तावर बसला. ह्या आवधींत **शिवाजी**नें विजापुरकरांचा बराच मुलूख काबीज केला. त्यामुळें दरबारच्या मंडळीस आपल्या स्वातंत्र्यास व इभ्रतीस धक्का बसेल, अशी दहशत बसली. तेव्हां **शिवाजी**चें पारिपत्य कसें करावें, हा विचार त्यांस पडला. दरबारीं मोठीं कारस्थानें चालू झालीं. कारण **शिवाजी**च्या राज्याची मर्यादा फार वाढली. हें वर दर्शविलेंच आहे. त्याच प्रमाणें त्यांनीं फौजफाटहि ज्यास्त वाढविली व अनेक पराक्रमी सरदारही संग्रहीं केले. ह्याची जाणिव त्यांस झालीच होती. अर्थात **शिवाजी**चा बंदोबस्त ह्याच वेळीं केला नाहीं, तर ह्या पुढें आपल्या राज्यासहीं धोका येईल अशी त्याची खात्री झाली; परंतु शिवाजींचा बंदोबस्त कसा करावा

ह्याचा निर्णय लागेना. कारण आदिलशाही दारबारांतील एकहि सरदार **शिवाजीचें** पारिपत्य करण्यास धजेना. यावरून पहातां **शिवाजी**च्या पराक्रमाची जाणीव त्यांस पूर्ण अवगत होती, हें खास. कारण या वेळीं मराठ्यांच सर्व प्रयत्न विजापूरकरांचा नायनाट करण्याकडे होते. त्यास नामशेष केल्याशिवाय स्वराज्याचा आणि स्वधर्म स्थापनेचा पाया मजबूत होणार नाहीं. हें ते पक्कें जाणून होते. व ह्याच भावनेनें अनेक जवानमर्द वीर आपल्या शुद्ध व सतेज रक्तानें पराक्रम गाजवीत होते. ह्याच सुमारास मरठ्यांचा मोर्चा वाइ प्रांतातील मुलूख काबीज करण्याकडे वळला होता. त्या वेळीं ह्या प्रांतांवर अफजूलखान नामें विजापूरकरांचा सरदार होता. त्याचेंकडून कागाळ्यांची आरडाओरड अदिलशाही दरबारीं फार झाली. त्याचें मुख्य कारण असें होते कीं, वाई मिरज, जमखिंडी वगैरे प्रांतांत खुद्द अफजुलखानाची जहागिरी बरीच होती, आणि या प्रांतांत मराठ्यांचा उपद्रव होत असल्यामुळें, अफजुलखानाचें प्रत्यक्ष व्यक्तिशः नुकसान फार झालें त्याखेरीज ह्या प्रांतातले किल्लेदार, देशमुख देशपांडे. वगैरे शिवाजीनें आपल्या बाजूस वळविलें. त्यामुळें त्याज कडील वसूल अफजूलखानास मिळण्याचा बंद झाला. अशा अनेक कारणांवरूर अफजूलखान **शिवाजीवर** फारच संतापला होता; परंतु त्याची **शिवाजी** बरोबर दोन हात करण्याची सिद्धता नव्हती हें खास; तेव्हां त्यानीं विजापूर दरबारीं विनवणी, केली कीं, मला जर दरबारांतून मदत होईल, तर मी **शिवाजीचें** पारिपत्य करीन.

वर दिल्याप्रमाणें अफजुलखानासारख्याची केविलवाणी स्थिती कां बरें व्हावी? तसेंच आज दीड शतक अदिलशाहीचा पूर्ण अंमल झाला असतां. तिच्या दरबारी मंडळीनें किंवा तेथील महापराक्रमी सरदारानीं भयभीत कां व्हावें!! ह्याचा क्षणभर विचार केला असतां, त्यावेळीं तेथें स्वाभिमानशून्य व देश हितविघातक अशांचा जमाव होता. हें सिद्ध होतें. अशी परिस्थिती असल्यामुळें त्यांस यशप्राप्ति

होणें शक्यच नव्हतें. त्याच्या उलट **शिवाजी**कडील सरदारांत स्वाभिमान व स्वदेशाभिमान ह्या अमुल्य गुणांचा संग्रह झाल्यामुळें अपयश प्राप्त होणें शक्यच नव्हतें.

शिवाजीस **चरित्रनायकां**सारखे जे कित्येक मावळे व इतर सरदार येऊन मिळाले ते केवळ स्वाभिमान व देशाभिमान ह्या दोन गुणानीं युक्त असे होते. म्हणूनच त्याचे प्रयत्न सुफलित झाले. **चरित्रनायक** आपलें स्वहित सोडून स्वातंत्र्याकारितां आपला देह झिजविण्यास उद्युक्त झाले, म्हणूनच त्यांना यवनी राज्यावर तीव्र आघात करून तें धुळीस मिळवितां आलें, व मराठी राज्याची इमारत अल्पावधींत उभारतां आली. ही इमारत उभारण्याकरितां **चरित्रनायक** शिवाजीच्या राजकारणाच्या प्रारंभापासून स्वराज्याच्या मोहिमेंत दाखल झाले, व त्यांनीं अनेक पराक्रमाचीं कार्यें करून, आपला देशाभिमान ह्या महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरंतन करून ठेविला. तसेच अनेक विश्वासाचीं कामें पार पाडलीं. त्यामुळें शिवाजीचें त्याजवर फारच प्रेम जडलें होतें, म्हणूनच त्यांची खाजगी मंडळांत नेमणूक झाली. ह्या त्यांच्या पराक्रमाचा उल्लेख, इतिहासांत विशेष प्रसिद्धपणें झालेला दिसत नाहीं. परंतु त्यांनीं जे कित्येक महत्वाचे पराक्रम केले, त्या सर्वांत अफजुलखानाच्या वधाचे वेळीं जें धाडसाचें कृत्य केलें. तें फारच अवर्णनीय होतें. त्याचा उल्लेख पुढील भागांत देण्यांत येईल.

# भाग ४ था.

## पराक्रम व शेवट

मागील भागांत अफजुलखानानें विजापूर दरबारांत विनंती केली हें दर्शविलेंच आहे. यावेळीं जवानमर्द मराठे व मावळे वीरांनीं, आपल्या शुद्ध व सतेज बुद्धीनें, आपला स्वराज्याचा रम्य रोपा मोठ्या झपाट्यानें पल्लवयुक्त केला. चंद्रावमोरे, बाजीघोरपडे. बांदलेदेशमुख इत्यादिकांचा कांटा काढून टाकिल्यामुळें, तो रोपा मोठ्या जोमानें वाढून लागला होता. व लौकरच त्याच्या रम्य व शीतळ छायेखालीं सुखानें कालक्रमणा करण्याची सुसंधि लाधेल, अशी मावळे वीरांना, आशा वाटूं लागली होती. इतक्यांत त्या जोमानें फोफावणाऱ्या स्वातंत्र्याच्या रोपाला, खच्चीं करण्याची इच्छा मराठ्यांच्या शत्रूच्या अंःतकरणांत उद्भवली. तो रोप अशाच जोमानें व झपाट्यानें वाढत गेल्यास, विजापूरच्या राज्याची इमारत पार जमीनदोस्त केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी विजापूर दरबाराला मोठी काळजी लागून राहिली होती. हें मागील भागांत दिलेंच आहे. ह्या संकटसमयीं अफजुलखानाची विनंती जणूंकाय यमदूतासच प्रतिबंध करणाऱ्या प्रमाणें वाटली. त्यांत आश्चर्य तें काय ! त्यावेळीं बेगमसाहेबाची तर पांचावरधारण बसली होती, तिनें अफजुलखानास त्वरीस बोलाविलें. त्याच्या सन्मानार्थ तिनें मोठा दरबार भरविला. त्या दरबारांत बेगमसाहेबांची, ती केविलवाणी स्थिती पाहून, व त्यांनीं ती काकुळतीनें केलेली विनंती, ऐकून जमलेल्या प्रत्येक सरदारांचीं अतःकरणें, स्वामीभक्तीनें द्रवून गेलीं. त्यावेळीं अफजुलखान पुढें होऊन मोठ्या-गर्वोक्तीनें व वीररसप्रचुर भाषण करून बोलला कीं, माझ्यापुढें शिवाजी

म्हणजे काय? डोंगरांतील उंदीर! त्यांस मी जिवंत अगर मेलेला कसा तरी पकडून, ह्या तक्तापाशीं आणितो! अशी त्यानें भरदरबारांत घोर प्रतिज्ञा केली.

अफजुलखान हा त्यावेळीं विजापूरच्या तक्तावर असलेल्या, आल्ली आदिलशहाचा मामा असून विजापूरच्या दरबारांत **शहाजीराजे**, रणदुल्लाखान इत्यादिकांच्या विरुद्ध बाजूच्या लोकांत तो प्रमुख व पुढारी होता. रणदुल्लाखानाच्या विरुद्ध व त्याचा कट्टा वैरी असल्यामुळें, रणदुल्लाखानाच्या बाजूचा **शहाजी**, अर्थात त्याचा हा वैरी होता. आणि वैऱ्याच्या मुलाचा कांटा काढून टाकावा असें त्यांस वाटत असे. तद्वत तो स्वभावानें क्रूर, घातकी पातळयंत्री व अतिशय गर्विष्ठ असा होता- सन १६५३ च्या सुमारास तो कर्नाटकांत असतांना, **शिवाजी**चा वडील भाऊ **संभाजीराजे** यास दग्यानें, मारणार तो हाच! त्याचें ते गर्वाचें व वीररस प्रचुर भाषण आणि केलेली ती घनघोर प्रतिज्ञा ऐकून, बेगामसाहेबास तर अत्यानंद झाला, व ताबडतोब तिनें त्याची त्या कामावर योजना केली. अफजुलखानानें भरदरबारांत केलेली प्रतिज्ञा, आपला गुरु "उंस्तादास" यांस सांगीतली· त्याच वेळीं त्याच्या गुरुनें त्यांस सांगीतलें कीं, **शिवाजी** अवतारी पुरुष आहे. तुझी प्रतिज्ञा शेवटांस जाणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर, तुझ्या प्राणांस अपाय होण्याचाही संभव आहे, करितां यापासून परावृत्त हो! आपल्या गुरुनें आपणांस अशा प्रकारें निरुत्साह केलें, त्याबद्दल त्यास अत्यंत वाईट वाटलें, त्याचप्रमाणें त्यानें आपल्या जनानखान्यांतील स्त्रियांस आपण केलेली प्रतिज्ञा सांगितली, तेव्हां त्याच्या स्त्रियानींहि त्यांस त्याच प्रमाणें विनवणी केली, त्यामुळें त्यांस अनिवार संताप आला, त्या संतापाच्या भरांत त्यानें आपल्या एकुणपन्नास स्त्रियांचा क्रूरपणानें शिरच्छेद केला. त्याच धुंदीत तो सन १६५९ च्या सप्टेंबर महिन्यांत निवडक बाराहजार फौज, हत्ती, घोडे वगैरे घेऊन शिवाजीला

पकडून आणण्याकरितां, एक पिंजरा, इतकी सामुग्री त्यानें आपल्याबरोबर घेतली. अशा थाटानें तो विजापुरांतून बाहेर पडला.

अफजुलखान प्रचंड सैन्य घेऊन आपणांवर येत आहे. ही बातमी रायगडावर **शिवाजी**स कळली. तेव्हां त्यास विचार पडला कीं, अफजुलखानासारखा प्रचंड योद्धा, आपणावर चालून येत आहे. त्याजबरोबर उघड्या मैदानांत लढाई करून, आपली धडगत लागणार नाहीं. हें जाणून **शिवाजी** प्रतापगडावर निघून गेला. ही हकिगत अफजुलखानास कळतांच तोही शिवाजीचा विध्वंस करावा, ह्याबद्दल नानाप्रकारच्या युक्त्या योजीत व मनःक्षेत्रावर मनोराज्यचे मनोरे उभारीत प्रतापगडाच्या रोखानें, वाईप्रांतीं आला. वाटेंत त्यानें हिंदुचीं अनेक देवालयें उध्वस्त केलीं. देवाच्या मूर्तिही फोडल्या, असा तो घोर कृत्यें करीत आला. त्याचप्रमाणें मलवडीच्या बाजी निंबाळकरास पकडून त्याचे हाल हाल केले. ह्यावरील दुष्ट कृत्यामुळें, तेथील बहुतेक लोक त्याजवर फार संतापले होते.

**शिवाजी** प्रतापगडावर गेल्याची बातमी अफजुलखानास कळली, तेव्हां त्यास प्रथम आनंद वाटला. कारण त्यास त्या प्रांताची चांगलीच माहिती होती. व आतां आपण त्यास सहज चिमट्यांत धरूं अशी आशा त्याच्या मनांत प्रादुर्भूत झाली. या आशेनेंच आजपर्यंत किती तरी लोकांना रसातळास नेलेलें आहे बरें ! **शिवाजी**वर आपण एकदम तुटून पडल्यास त्याचें आपल्या सैन्या-पुढें कांहीं चालावयाचें नाहीं. त्याच्या थोड्याशा लोकांना आपण जरजर करूं. अशी त्याला घमेंड होती तरी पण न जाणो ! मराठ्यांचा, तशांत, मावळ्यांसारख्या कडव्या व पराक्रमी लोकांशीं गांठ आहे. कदाचित् असल्या डोंगराळ प्रदेशांत आपल्या दरबारी व खानदानी

सैन्याचा टिकाव लागणार नाहीं. असेंही त्यास वाटलें. तेव्हां कांहीं तरी युक्ति प्रयुक्तीनें, त्यास उघड्या मैदानांत आणून विश्वासघातानेंच, त्याचा धुव्वा उडवून द्यावा, असा त्यानें बेत केला.

**शिवाजी** प्रतापगडावर आल्याबरोबर त्यांनीं किल्याचा योग्य बंदोबस्त करण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं गेलेल्या आपल्या सर्व सरदारांस बोलावून आणिलें. ते आल्यावर प्रतापगडाचा योग्य बंदोबस्त करून आलेल्या संकटांतून, पार कसें पडतां येईल, ह्या विचारांत ते लागले. खान, वाईस आल्यापासून **चरित्रनायक** आपल्या सरंजमाचा दिवसा बंदोबस्त ठेवून, रात्रीच्याप्रहरीं **फकीरा**च्या वेशानें खानाच्या गोटांत भिक्षामागण्यास जाऊंलागले. भिक्षा मागतानां खानाच्या लष्कराची स्थिती कशी आहे. त्यांचे बेत काय चालले आहेत. ह्याकडे **चरित्रनायका**चें सर्व लक्ष वेधलेलें असे. खानाच्या छावणींतील लोकांस हा **फकिर** नसून शत्रूकडील **हेर** आहे, व तो आपल्या लष्कराची टेहळणी करण्याकरितां येतो, अशी शंका कोणासहि येणें शक्य नव्हतें.इतकी त्याची अजब कृति असे. ह्या बेमालूम कृति मुळेंच **चरित्रनायकांचा** शिरकाव खानाच्या लष्करांतच नव्हे तर, मोठमोठ्या सरदारांच्या गोटांपर्यंत होऊन, कित्येकांस तर ह्या **फकीरा**पासून रात्रौ मोठी करमणूक होत असे. ह्याप्रमाणें **चरित्रनायक** खानाकडील दररोज निरनिराळ्या बातम्या आणून **शिवाजी** अगर **चिटणी**सास देत असत, त्यामुळें शिवाजीस कोणती व्यवस्था व ती कशाप्रकारें करावी, हें ठरविण्यास अवसर मिळत असे.

मागें दिल्याप्रमाणें **खानास** मोठा विचार पडला होता, तो असा कीं **शिवाजी**नें जर ह्या डोंगराळ प्रदेशांत, लुटालूट अगर दंगा धोपा केला, तर आपल्या सैन्याचें

फारच हाल होतील, तेव्हां त्याजबरोबर सलोख्यानें वागून, विश्वासघातानें त्यांस पकडावें, असा विचार करून, वाई येथील कुळकर्णी कृष्णाजी भास्कर ह्मणून होता, त्यांस बोलावून आणिलें, व प्रतापगडावर जाऊन **शिवाजी**स निरोप सांगण्यांस सांगितला कीं. "मजला आमच्या सरकारचा सक्त हुकूम आहे, कीं, तुझें पारीपत्य करून कैद करून आणावें, परंतु मी तुझ्या वडीलांचा जुना स्नेही असल्यामुळें, तसें करणें मला इष्ट वाटत नाहीं, तेव्हां स्नेहाच्या दृष्टीनें, त्याच्या मुलाचें अहित न करीतां उपदेशाच्या दोन गोष्टी सांगाव्या, या उद्देशानें कळवीत आहे. तेव्हां तूं मला त्वरीत येऊन भेट, ह्मणजे मी पादशाहाची भेट करून देईन. इतकेंच नव्हे तर बादशहाकडून कांहीं बक्षीसहि देण्याची शिफारस करीन! किंबहुना तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी करून देईन." याप्रमाणें खानाचा निरोप सांगण्याकरितां कृष्णाजी भास्कर दुसऱ्याच दिवशीं आला, परंतु खानानें आपल्या वकिलांस वरीलप्रमाणें आपला मनोदय कळविला, तेव्हां त्यांस वाटले कीं, ह्या मायावी भाषणांस शिवाजी खास भुलेल, आणि आपल्या भेटीस निःसंशय येईल; ह्या आनंदाच्या लहरींत गर्क होऊन, तो आपल्या सरदारांजवळ, मोठ्या मर्दुमकीनें बोलूं लागला कीं, आमचे जवळ कांहीं युक्त्या नाहींत काय? त्या भिकार **शिवाजी**नें केवळ लुटारूपणा करावा, यांस थोडें आमीष दाखविलें कीं, तो सहज आमच्या म्हणण्यास कबूल होईल, व अशा रीतीनें एकदां तो हातीं लागला, म्हणजे त्याचें पारिपत्य करणें तें माझ्या मर्जीप्रमाणें मी करणार! हे खानाचें दांभिकपणाचें सर्व भाषण **चरित्रनायका**नें ऐकून, कृष्णाजी भास्कर प्रतापगडावर येण्यापूर्वींच ते **शिवाजीमहाराजां**स सांगितलें होतें. कांहीं वेळानें कृष्णाजी भास्कर प्रतापगडावर आल्याची वर्दी आली. पुढें कांहीं वेळांनीं **महाराजा**नें त्याची भेट घेतली. त्यावेळीं खानानें पढविलेला पाढा त्यानें म्हणुन दाखविला. पण असल्या

मायावी भाषणानें फसून जाणारा **शिवाजी** इतका कांहीं दुधखुळा नव्हता, कारण जो मनुष्य आपणांस जिवंत अगर मेलेला धरून आपण्याकरितां भर दरबारांत प्रतिज्ञा ठोकतो, जो हिंदुंच्या देवता विच्छिन्न करण्यास यत्किंचितहि मागें पुढें पहात नाहीं, जो आपणांस पकडण्याकरितां, जिकडे तिकडे मोर्चे लावून ठेवितो, त्याच्या मनांत आपल्याविषयीं इतकें प्रेम असणें, म्हणजे पूर्वेकडील सूर्य पश्चिमे-कडे उगविला पाहिजे. त्याचा हेतु आपणांस युक्तिप्रयुक्तीनें बाहेर काढून पकड-ण्याचा असावा, हेंच खास ! इतकी महाराजांची सिद्धता होण्यास मुख्य कारण **चरित्रनायक**च होत. **चरित्रनायका**नें हा खानाचा हेतू पूर्वीच त्यांस विदित केला होता. कृष्णाजी भास्करानें खानानें सांगितलेला सर्व पाढा महाराजांस सांगितला, त्यावेळीं **महाराज** आनंदी मुद्रा करून थोडें हांसले, व मानभाविक-पणानें बोलेल कीं, खानाचे मजवर हे उपकारच आहेत, त्याजकडून आमचे अहित कधींही होणार नाहीं. असें म्हणुन, त्यांस निरोप देतांना आपला वकील पंताजी गोपिनाथ यांस खानाकडे पाठवून, पुढील कार्याची दिशा आंखण्याचें विदित केलें. आपल्या भाषाणामुळें महाराज खूष झाले, असें त्यांच्या हांसण्याचा भावार्थ समजून त्या आनंदांत कृष्णाजी भास्कर निघून गेला; परंतु **महाराज** हांसलें त्याचा आशय असा होता कीं, ही सर्व हकीकत तुमच्या पूर्वीच मला कळली, हेंच दर्शविलें.

**चरित्रनायक** किती धाडसी आहे. हें **महाराजां**स तोरणा किल्ला घेतल्यापासून हा काळपर्यंत अनेक प्रसंगी कळलेंच होतें. परंतु अफजुलखानाच्या गोटाचा सक्त पहारा असतानांहि, त्यांतून आपला शिरकाव त्यानें निर्वेध करून घेतला. ह्याबद्दल महाराजांस फारच आश्चर्य वाटलें. वास्तविक पहातां कर्तृत्वाचें आश्चर्य कां वाटावें ! कारण जो कर्तृत्वान आहे, अगर खऱ्याची ज्यास कळकळ आहे, त्यास अंगिका-रिलेलें कृत्य करणें, हें त्याचें कर्तव्य कर्मच आहे, असें समजून प्रत्येक सरदारच नव्हे तर प्रत्येक मनुष्यप्राणी हें कृत्य आपलेंच म्हणुन करण्यास सिद्ध होत असें, इतकेंच नव्हे तर, त्यावेळीं त्यांनीं आपल्या प्राणाचीहि पर्वा केली नाहीं. ह्याची इतिहासच

साक्ष पटवीत आहे. अर्थात **चरित्रनायकां**च्या कृत्याबद्दल **शिवाजी**स आश्चर्य कां वाटावें ? परंतु येथें आश्चर्य वाटणें स्वाभाविक आहे; कारण अफजुलखान स्वतःदुष्ट स्वभावाचा व घातकी असून, अति संशयी होता. त्यास यत्किंचितहि संशय आला, तर तो आपल्या पदरच्याहि मनुष्याचा शिरच्छेद कोणताहि विचार न करितां करीत असे, हें **शिवाजी**स अवगत होतेंच. अशा मनुष्याच्या तोंडाची बातमी आणणें हें किती धाडसाचें कृत्य, याची कल्पना वाचकानींच करावी.

पंताजी गोपिनाथ खानाकडे जाऊन, त्यांनीं त्यांस शिवाजीचा, निरोप अति नम्रतेनें सांगितला, तो ऐकून खान फारच खूष झाला तो त्याच रात्रीं आपल्या खाशा मंडळींत बोलला कीं, माझी कृत्रीम मात्रा **शिवाजी**स चांगलीच लागू पडली. अहो ! शिवाजी आम्हांपुढें काय ! त्यानें केवळ पुंडाई करावी. अशा पुंडाई करणारास थोडेंसें आमिष दाखविलें कीं तेव्हांच ते वश होतात. अशा प्रकारें त्यांचें बोलणें चाललें होतें. तें **चरित्रनायका**नें ऐकिलें, थोडक्याच वेळानें खानानें या आनंदाचे लहरींत पंताजी गोपिनाथाची भेट घेतली. त्या भेटींत असें ठरलें कीं, परस्परांच्या भेटी व्हाव्या, परंतु त्या कोणत्या ठिकाणीं व्हाव्या, ह्याचा निर्णय फक्त राहीला होता, तो शिवाजीकडून ठरवावा, असें त्याच बैठकींत त्याही ठरविलें.

वरील हकिकत **चरित्रनायका**नें दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं, महाराज, मातोश्री जिजाबाई व **बाळाजी आवजी** वगैरे मंडळीस सांगितली. त्यावळीं त्यांचा आलेल्या अरिष्टांतून पार कसें पडावें, हा खल चालला होता, इतक्यांत खानाची आपल्या मंडळी बरोबर व आपल्या वकीलाबरोबर झालेली संभाषणें त्यानें सांगितलीं. त्या-वेळीं **शिवाजीनें चरित्रनायका**चें सर्व भाषण ऐकून घेतल्यावर म्हणाले कीं खानाचें कपट मी आतां पूर्ण जाणून आहे. जिवावर बेतलेल्या प्रसंगीं जशास तसें केल्यावांचून गत्यंतर नाहीं. कपटानें दुसऱ्याचा घात करणें फार कठीण असतें. मी आतां

सावधच आहे, परंतु **विश्वासराव** तुह्मांवर प्रथम संकट येण्याचा संभव आहे. फार सावधगिरीनें असा, शत्रूचा पराभव करण्यास **श्रीतुळजाभवानी** समर्थ आहे. मजला साह्य करण्यास तुमच्या सारखे धूर्त व मर्द असतां, अफजुलखानाचें तें काय चालणार ? असें ह्मणून **चरित्रनायकाचा** शिवाजीनें त्याच वेळीं योग्य शब्दांत गौरव केला.

पंताजी गोपिनाथ यांस खानाकडून महाराजांच्या भेटीचा दिवस नक्की ठरविण्याचें जरी कळविलें होतें, तरी त्याचें उत्तर येईपर्यंत थांबण्याचें त्यांस अशक्य झालें होतें. त्यांनीं आपल्या वकीलास शिवाजाकडे जाऊन भेटीचा दिवस नक्की ठरवून येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें खानाचा वकील दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळीं प्रतापगडाखालील **फड** या गांवीं आला. त्यानें आपण आल्याची वर्दी गडावर पाठविली. तेव्हां महाराजांस त्याचे स्वगतार्थ व रहाण्याच्या व्यवस्थेकरितां गडावरून मनुष्येंहि पाठविलीं, व महाराज आपली एकांतीं भेट घेणार आहेत, असेंहि त्यांस कळविलें.

शिवाजीमहाराज संकटसमयीं **श्रीदेवीची** प्रार्थना करीत व तिच्या आशिर्वादाप्रमाणें वर्तन करीत, ह्या मामुली वहिवाटीप्रमाणें ह्या वेळींहि **श्रीदेवीचा** प्रसाद मिळविला होता. अर्थात आतां ह्या संकटांतून आपण पार पडूं, असा त्यांचा पक्का भरंसा झाला होता.

कृणाजी भास्कर शिवाजीस भेटण्यास आला होता. हें वर दिलेंच आहे. त्याची भेट शिवाजीनें, एकांतीं घेऊन खानाचा हेतु काय आहे, हें त्यांस विचारिलें, परंतु खानाचा वकील कांहीं असामान्य नव्हता. त्यांनें **शिवाजीस**

प्रथम दाद लागू दिली नाहीं. तेव्हां **चरित्रनायका**नें सांगतलेली हकिकत त्यांस मोठ्या खुबीनें विचारिली. तेव्हां तो फार आश्चर्यचकीत झाला, ह्याचें कारण हेंच कीं, आपणांकडील इत्यंभूत बातमी इकडे कशी कळते ? अर्थात त्यांस खानाचा अंतस्थ हेतु सांगांवा लागला. तेव्हां **शिवाजी** कृष्णाजी भास्करास बोलले कीं, पहा ! “ तुह्मीं ब्राह्मण आहात, आह्माला ब्राह्मण पूज्य, त्यांची यवनांच्या जाचांतून मुक्तता करावी, हिंदुधर्माची होत असलेली पायमल्ली नष्ट करावी, हा आमचा मुख्य हेतु. त्यांत तुमच्या सारख्यानें आम्हांस ह्या कार्यास अवश्य साह्य केलें पाहिजे. ” **शिवाजी**चें हें आवेशाचें व कळकळीचें भाषण कृष्णाजी पंताच्या मर्मस्थांनीं भिनलें. त्या भाषणाचा परिणाम असा झाला कीं या कामीं, आपणाकडून शक्य ती मदत करण्याचें त्यांनीं महाराजांस आश्वासन दिलें. खानाच्या वकिलाबरोबर अशाप्रकारें संगनमत करून **महाराज** आपल्या चिटणीसासह गडावर परत गेले. दुसरें दिवशीं प्रातःकाळीं रात्रौ झालेली हकिगत आपल्या मातोश्रीस सांगितली. त्यावेळीं **महाराजांनीं, चरित्रनायकाच्या** धाडसाची हकिगतही सांगितली: **चरित्रनायकांस** प्रथम प्रथम खानाच्या छावणींत शिरकाव करून घेतांनां बराच त्रास भोगावा लागला; परंतु आपल्या कर्तव्यापुढें त्यांस त्रासाचीं पर्वा नव्हती. हीच स्थिती कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडलेल्यांची आहे. आपत्कालाच्या तडाख्यांत सांपडला नाहीं, असा प्राणी विरळा. मात्र अवनतदशा प्राप्त झाली असतां, तींतून आपण कधींहीं पार पडणार नाहीं, असें समजणें, किंवा निराश होऊन स्वधर्म, नीति व कुलाचार हीं विसरून भलत्याच मार्गाचें अवलंबन करणें, हें अगदीं चुकीचें आहे. धिमेपणानें यत्न करीत गेलें असतां, काय साध्य होणार नाहीं ? “ प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळें ” ! असें म्हटलें आहे. निश्चय मात्र ढळूं देतां कामा नये. बीं रुजल्यावांचून जसा अंकूर फुटत नाहीं. तद्वत् कष्ट सोशिल्या वांचून किंवा विपत्कालीं धैर्याची कांस

बळकट धरून यत्न केल्यावांचून सुखप्राप्ति, अथवा राज्यप्राप्ति कधींही व्हावयाची नाहीं. सुखाची उत्पत्ति दुःखापासून व दुःखाची सूखापासून आहे, तेव्हां दुःख भोगिल्याशिवाय सुखाचे दिवस दृष्टीस पडावयाचे नाहींत. दुःख, धैर्य, अभिमान, दृढनिश्चय, सदाचरण, कर्तव्यजागृति वगैरे हीं मनुष्याच्या ठिकाणच्या गुणांची पारख करण्याची कसोटीच होय. घणाच्या घावांनींही न फुटणारा तोच खरा हिरा. भट्टींत तापवावें तसें अधिक उज्वलित होणारें सुवर्ण बावन्नकशी ठरतें, तद्वत् क्लेशरूप घणाच्या घावांनीं भग्न न होणारें, किंवा संकटाग्नीच्या भटींत पडलें असतां जास्त उज्वल होऊन निघणारें तेंच खरें धैर्य व तेच खरे सद्गुण होत. अस्तु !

चरित्रनायकास अफजुलखानाच्या सैन्यांत व गोटांत प्रवेश करितांना अनेक तऱ्हेनें छळ सोसावा लागला. परंतु आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. तेव्हां हा कोणी तरी खरोखरच अवलीया ( फकीर ) आहे. अशी तेथील सर्वांची खातरी झाली. म्हणूनच त्याचा शिरकाव खानाच्या गोटापर्यंत झाला. इतकेंच नव्हे तर रात्रींच्या प्रहरीं कित्येकांस ह्या फकीराकडून मोठी करमणूक होत असे.

उपरिनिर्दिष्ट केल्याप्रमाणें खानाच्या वकिलानें **महाराजां**बरोबर संगनमत केलें, पुढें उभयतांच्या वकिलांमध्यें असें ठरलें कीं, **महाराज** खानाच्या भेटीस न जातां त्यांची स्वतंत्रपणें निराळ्याच ठिकाणीं भेट करावी, व अशा प्रकारें महाराजांनीं शेरास सव्वाशेर या तत्वानें खानाचा सूड घ्यावा. ह्याप्रमाणें उभयतांचें संगनमत होऊन, ते परत खानाकडे गेले. त्यांनीं खान खूष होईल. अशाप्रकारें बोलून. **शिवाजी** फार भित्रा असल्यामुळें, आपल्या भेटीस गोटांत यावयास भितो ! परंतु जर आपण त्यांस भेटाल तर त्याच्या भेटण्याची व्यवस्था

करूं असें त्यास भरवून दिलें. खनाची हा वेळपर्यंत पक्की खात्री झाला होती, कीं, **शिवाजी** दुर्बळ आहे. अर्थात तो आपल्या भेटीस येऊं शकणार नाहीं. परंतु तो आपणांस भेटणार आहे. अर्थात आलेली संधी वाया न दवडतां आपणच त्यांस भेटावें हेंच आतां योग्य आहे. ह्या वेळीं खान आपल्या शहाणपणाच्या व शक्तीच्या घमेंडींत होता. त्यास आपल्या वकिलानें आपल्या शत्रूंबरोबर संगनमत करून आपणांस फसवीलें आहे, हें त्याच्या स्वप्नींही आलें नाहीं, म्हणूनच त्यांनीं आपल्या वकिलाच्या मायावी भाषणांस संमत दिली.

अफजुलखान **शिवाजी**च्या भेटीस येणार हें निश्चित झालें, दिवसही नक्की ठरला; हा दिवस मराठ्यांच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचा होय. ह्या दिवसाच्या परिणामावरच महाराष्ट्राच्या भावी इमारतीचा पाया अवलंबून होता. त्या दिवसाकरितां स्वराज्यसंस्थापकांचा आत्मा एकजीव झाला होता. तो दिवस पार पाडण्याकरितां त्यांचा अटोकाट प्रयत्न चालला होता. म्हणून तोच दिवस महाराष्ट्राच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेविला गेला. असो !

ह्या दिवसाकरितां महाराजांनीं प्रतापगडाखालीं मंडपाची वगैरे व्यवस्था करवून आपल्या संरक्षणार्थ व्यवस्था केली तः—बाबाजी भोसला, भीमातीरी होता, त्यांसैं वर्धनगड येथें पांच हजारी छावणी करून ठेऊन, महाबळेश्वराच्या घांट माथ्याचा बंदोबस्त करण्यास सांगितलें. नेताजी पालकरांस रडतोंडीच्या घाटांत आपल्या सैन्यासह ठेविलें. रघुनाथ बल्लाळ कोरडे यांस दहाहजार लोकांसह दबा धरून मंडपाशेजारील जंगलांत बसण्यास सांगितलें. मावळे दहाहजार, शामराज पद्मनाथ सातहजार व त्रिंबक भास्कर पांचहजार लष्करासह झाडींत दबा धरून बसविले. गडावर चिटणीस, पिंगळे व आण्णाजी दत्तो यांस ठेविलें.

मंडपाशेजारील दरींत जिवबा महाडीक, संभाजी कावजी, हिरोजी फर्जंद वगैरे खासगींतील लोक ठेविले. आबाजी रघुनाथ यांस चौक्याच्या बंदोबस्तास ठेविलें. **चरित्रनायक** मंडपाच्या पहाऱ्यावर होते, याप्रमाणें योग्य बंदोबस्त करून ठेविला.

अफजूलखानही आपली छावणी वाईहून उठवून, रडतोंडीच्या घाटांतून **पार** मुक्कामीं येऊन राहिला होता. उभयतांच्या भेटीचा दिवस जवळ आला. खानानें आपली छावणी हालवीली, तरी **चरित्रनायक**ानीं आपल्या **फकिरा**च्या वेशास फांटा दिला नव्हता. त्यांचा नित्यक्रम चालूच होता. दररोज नवीन नवीन बातमी आणितच होते. त्यामुळें **महाराजांस** निर्धास्तपणें पुढील कार्याची दिशा आंखण्यांस योग्य संधी मिळत असे, हें वर दिलेंच आहे.

उभयतांच्या भेटीची वेळ ठरली होती. त्याप्रमाणें खान आपल्या लोकांसह छावणींतून बाहेर पडला. तेव्हां पंताजी गोपिनाथानें त्यांस विनंती केली कीं, आपण इतक्या सरंजामासह गेल्यास, **शिवाजी** आपल्या भेटीस येणार नाहीं. कारण **शिवाजी** सडाच येणार आहे. तेव्हां तो आपले लोक तेथेंच ठेवून स्वतः पालखींत बसून निघाला. फक्त त्यानें आपल्याबरोबर आपला हुजऱ्या सैय्यद बांडा मात्र घेतला होता. व **शिवाजी**ही फक्त तानाजीसह आला. शिवाजीमंडपांत आल्यानंतर त्या दोघांमध्यें दोन चार कुशल शब्द होऊन, मित्रत्वाचें एकमेकांस आलिंगन देऊं लागलें. तोंच खानानें **महाराजांस** पुढें ओढून आपल्या डाव्याकुशीवर दाबून धरून डोकीवर कट्यारीचा वार केला. परंतु महाराजांच्या डोकीवर शीरस्त्राण असल्यामुळें वार लागला नाहीं. तोंच महाराजानें चलाखीनें आपलें अंग काढून घेऊन, डाव्या हातानें वळसा घालून बिचव्याचा वार खानाच्या पोटावर केला त्यामुळें खान

मार्गे सरला, व दगा रे दगा ! म्हणून ओरडला, आणि तरवार उपसून " अब हमारी तरवार देखो " असें म्हणून महाराजांवर वार केला. तथापि महाराजांचें अंगांत चिखलत असल्यामुळें, तरवारीचा वार लागला नाहीं. तेव्हां महाराजांनीं सफाई करून " तुम पठाण अब हमारी भवानी देखो " असें बोलून आपल्या तरवारीचा उलट वार केला, तो खानाच्या मर्मस्थानीं लागून त्याचा शेवट झाला. वरील गडबड ऐकून, खानाचे जे लोक बाहेर होते, ते धांवत आंत आले. त्यांस तानाजी, जिवबा, **चरित्रनायक** वगैरेनीं गारद केलें. ही गोष्ट इ० स० १६५९ शके १५८१ विकरी नाम संवत्सरे मार्गशिर्ष शु॥ ७ गुरुवार रोजीं झाली.

**चरित्रनायकानें** फकिराचा वेष धारण करून शत्रूच्या गोटांत जाऊन, तेथील सैन्याच्या हालचाली व त्यांचे बेत काय आहेत, ह्यासंबंधीं गुप्त बातम्या आणिल्या नसत्या तर **महाराजांस** हा प्रसंग मोठा भयंकर गेला असता, अर्थात खानाचा वध होणेंही अशक्य झालें असतें. " आपल्या लष्करांत सावधगिरी ठेऊन शत्रूंच्या लष्करांत गाफीलपणा ठेवण्यास पण हा **विसूच** कारण झाला. असें जिजाबाईसाहेब वारंवार ह्मणत असत. "

## चरित्रनायकाच्या वरील कृत्याबद्दल कांहीं ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत आपलीं मतें व्यक्त केलीं आहेत तीं:—

" **विश्वासराव नानाजी मुसेखोरेकर** म्हणून एक सरदार शिवाजीजवळ होता. त्यानें फकिराच्या वेषानें खानाच्या छावणींत वारंवार जाऊन तेथील खडान खडा बातमी आणून शिवाजीस दिली. त्यावरून शिवाजीनें आपला पुढील बेत ठरविला."

म. रि. पा. २४४

" अफझुलखान वाईस येऊन भिडला, तेव्हां त्याच्या गोटांतील एकंदर हाल-चाल कशी काय आहे, व त्याच्या बरोबर सैन्याची वगैरे सिद्धता कितपत आहे, तें पाहण्यासाठीं महाराजांनीं, त्या कामगिरीवर **विश्वासराव नानाप्रभु** याची नेमणूक केली. हा विश्वासराव फकीराचा वेष घेऊन दररोज रात्रीं त्यांच्या गोटांत हिंडे व एकंदर बातमी महाराजांस पोंचवी. ह्यावरून महाराजांना कळून आलें कीं, खानाबरोबर मोठी फौज असून त्याची तयारी भक्कम आहे."

केळूसकर कृत शि. म. च. पा. १५३ प. अ.

" या दोन्ही सरदारांचे हेर एकमेकांच्या गोटांत निरनिराळ्या मिषानें जाऊन बातम्या काढीत होते. शिवाजी तर्फे कोणी **विश्वासराव** या नांवाचा मनुष्य दररोज फकीराचा वेष घेऊन खानाच्या लष्करांत भिक्षा मागण्याकरितां जाई व तेथून बातमी काढून आणी असें म्हणतात. या हेरांच्या जातीचे प्राणी सर्व राजे लोक बाहेरून निंदतात व ते हातीं सांपडेल म्हणजे त्यांना देहांत शासन देतात.

भावेकृत. अ. वध.

" Afzulkhan marched through Rahimatpur to Wai where he amused himself by preparing a cage for Shivaji's confinement. At the same time he sent a messenger to Shivaji inviting him to a conference at Wai, but Shivaji now had some experience of Bijapur ways. **Vishwasrao**, a prabhu by caste and the chief of Shivaji's secret service had already made his way dressed in a Fakir's garb into

Afzulkhan's camp and had heard him boast that he meant to entrap Shivaji and take him prisoner to Bijapur. This information **Vishwasrao** at once communicated to his master. When Afzulkhan's envoy Krishnaji Bhaskar reached Pratapgad Shivaji affected to believe his words and expressed himself as anxious to meet the Khah as the latter was to meet him."

History of the Maratha people by C. A. Kincaid and R. B. Parasnis, Page 158.

" मध्यंतरी **विश्वास नानाजी मुसेखोरेकर** म्हणून एक प्रभुजातीचा सरदार शिवाजीजवळ होता. त्यानें फकीराच्या वेषानें खानाच्या छावणांत वारंवार जाऊन तेथील वित्तंबातमी महाराजांस आणून दिली. सतराव्या शतकांत त्यांना जी यशःप्राप्ति झाली, त्याचें कारण हेंच कीं, त्यावेळेस ब्राह्मण, प्रभु, मराठे, शूद्र इत्यादि अनेक जातीच्या लोकांनीं आपण सर्वजण एकाच धर्माचे व एकाच हाडामासांचे आहोंत, असा उज्वल भाव आपले ठायीं बाणून घेऊन शिवाजी महाराजांना हिंदुपादशाहीची इमारत उठविण्याच्या कामांत एक दिलानें व एकाग्र चित्तानें मदत केली. त्यावेळेस मराठे वेदोक्ताबद्दल भांडत तंडत बसले नाहींत. प्रभूनीं ब्राह्मणांचा द्वेष केला नाहीं, किंवा ब्राह्मणांनीं आपल्या उच्च वर्णाच्या तोऱ्यांत क्षत्रियांना साह्य करण्यास कांकू केलें नाहीं. सर्व महाराष्ट्रीय

एकीच्या अभेद्य बंधनांनीं एकत्र जखडून गेले होते, व यवनी राज्याच्या ठिकऱ्या उडविण्यास प्रत्येकजण अटोकट प्रयत्न करीत होता. महाराष्ट्रीयांत जोंपर्यंत एकी होती तोंपर्यंत मोठ मोठे मी मी ह्मणणारे तिस्मारखान सुद्धां त्यांना वचकून होते. पण त्या एकीची बेकी झाल्याबरोबर त्यांचा पार विचका उडून गेला, व सध्यां आमच्यांत तिचा अभाव असल्यामुळें अजूनहि होत आहे. ज्यावेळेस सर्व महाराष्ट्रीय एकीनें एकत्र केले जातील, तो खरोखर सुदिन होय !

भोपटकरकृत नव–रत्नांचा–हार–पान १४–१५

वरील हाकिकतीवरून पाहतां, ह्या भयंकर प्रसंगांतील **चरित्रनायकाच्या** धैर्याची कल्पना वाचकांनींच करावी ! अशा संकटसमयीं **चरित्रनायकानें** आपणांस उपकृत केलें, त्याचें पारितोषक ह्मणून महाराजांनीं त्यांस आणखी पांच हजारी पायदळाची सरदारी देऊन गौरव केला.

दिवसेंदिवस शिवाजीमहाराजांचा वचक विजापुरासच काय; परंतु मोगलासहि बसला. ह्याचें मुख्य कारण प्रत्येक सरदार किंवा किल्लेदार हे केवळ आपल्या नोकरीच्या पेशानेंच किंवा स्वार्थाकरितां लढत नसून आपण मराठी राज्य-संस्थापक या अंतिम ध्येयामुळें आपला प्राण रणांगणीं जाईपर्यंत शत्रूंस हार जात नसत. म्हणूनच अशा भयंकर परिस्थितींतून मराठ्यांचा उदय झाला.

ह्याप्रमाणें महाराजांनीं आपल्या विश्वासू साथीदारांच्या अतुल पराक्रमानें विजापूरकरांची राजसत्ता निर्जीव केली. तेव्हां त्यांनीं निरुपायास्तव महाराजां-बरोबर इ. स. १६६२ त शहाजीराजे यांचे मार्फत तह करविला. त्यामुळें

मराठ्यांचा मोर्चा मोगलांच्या मुलखाकडे वळला. ह्यावेळीं मोगलांचा दौलताबाद येथील सुभेदार हुकूमसिंग, फारच घाबरून गेला. त्यानें त्वरित दिल्लीस कळविलें कीं, "मराठ्यानें इकडे आपल्या प्रांतांतील मुलूख लुटून उध्वस्त करण्याची सुरवात केली आहे. तरी त्यांच पारिपत्य वेळींच न झाल्यास पुढें आपणांस जड जाईल, करितां कळवीत आहे." त्यांस पादशहाकडून उत्तर आलें कीं, तुम्हीं पुरुष असून तुमच्यानें सुभ्याच्या बंदोबस्ताचें काम होत नाहीं. मर्द असतां नामर्द झालांत ! तेव्हां हीं कामें बायकांच करतील ! व आम्हीं त्यांच्याकडून करवून घेऊं. त्याप्रमाणें मोगलाकडून **माहूरकर उदाराम देशमुख** याची बहीण **रायबागीण** ही मोठ्या धैर्याची व शूर स्त्री होती, तिची दक्षिण प्रांताच्या सुभ्यावर नेमणूक केली. ह्यावेळीं मोगलांचा खजीना कोंकण प्रांतांतून येणें फारच दुरापास्त झाला होता. ह्मणून तिजला मुद्दाम कोंकण प्रांताचा खजीना आणण्याकरितां, मोठी फौज देऊन पाठविली. ती कोंकणप्रांतांतील खजीना उमरखिंडीच्या मार्गानें घेऊन येत आहे. ही बातमी महाराजांस समजली. तेव्हां त्यांनीं तो खजीना लुटून आणण्याकरितां **चरित्रनायक, यशवंतराव रामाजी नाडकर, बोराटीकर रामाजी पाटील** यांस पाठविलें. ते प्रत्येकीं आपल्या पांच हजारी मावळे लोकांसह ह्या कार्यावर निघाले.

**रायबागीण** ही मोठी हिंम्मतवान व शूर बायको होती. हें वर दिलेंच आहे. तिची व **शिवा**जीकडील मावळे सरदारांची गांठ उमरखिंडींत पडली. दोन्ही फौजा मोठ्या निकरानें लढूं लागल्या. कोणी कोणांस हार जाईनात. त्यावेळीं **चरित्रनायकानें** मोठ्या युक्तीनें आपलें सैन्य मागें घेऊन, खिंडीचा मोर्चा धरून बसविलें, तोंच मोगली सैन्य मोठ्या झपाट्यानें पुढें सरसावलें. तें पुढें येतांच **चरित्र-**

**नायकानें** जो विलक्षण पराक्रम केला, तो फारच अवर्णनीय होता. त्यांनीं त्या खिंडींत असा कांहीं मोर्चा धरला कीं, **रायबागिणी**च्या सैन्यास खिंडींतच कोंडून टाकल्यामुळें त्यांच्या युद्ध सामुग्रीचा कांहींच उपयोग न होतां, त्यांस मावळे सरदारांच्या स्वाधीन व्हावें लागलें. ह्या लुटींत मोगलांचा दक्षिण प्रांताचा खाजिना त्यांस मिळाला तो निराळाच, त्या खेरीज हत्ती, घोडे,उंट, डेरे, दांडे वगैरे उत्तम लाढाईची सामुग्री मिळाली. सदरहू लुटींत विजयीं झालेल्या सरदारांस **महाराजानें** हत्ती, घोडे वगैरे बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला.

वरील हकीकत औरंगजेबास कळली, तेव्हां त्यांस मराठ्यांचा फारच संताप आला, त्यांचा सूड घेण्याकरितां, त्यांनीं आपला सरदार शाहिस्तेखान याजबरोबर प्रचंड सैन्य देऊन दक्षिणेंत पाठविला. त्याची वासलाद **शिवाजीनें** आपले बालमित्र **दादजी बापुजी व चिमणाजी बापुजी देशपांडे** या बंधुद्वयाच्या साह्यानें सन १६६२ त कशी लाविली. हें इतिहास प्रसिद्धच आहे.

शाहिस्तेखानासारखा शूर, मर्द व मुत्सद्दी सरदार नामोहर होऊन पळून गेला. तेव्हां तर औरंगजेब फारच घाबरला, परंतु तो स्वतः दुष्ट स्वभावाचा असल्यामुळें, त्यानें शिवाजीवर **मिरझाराजे व दिल्लेरखान** ह्या पराक्रमी सरदारांबरोबर ऐशीं हजार सैन्य देऊन पाठविले. ते दोघे सिंहगड व पुरंदर या दोन किल्याचे दरम्यान येऊन राहिले. दिल्लेरखान पुरंदर घेण्याकरितां मोठ्या हिंमतीनें निघाला. त्यावेळीं पुरंदरचा किल्लेदार **सरदार मुरार बाजी देशपांडे** व रुद्रमाळ्याचे किल्लेदार **बाबाजी बोवाजी** व **यशवंतराव बोवाजी** या वीरांचे—प्रसिद्ध महाराष्ट्र कविवर्य मोरोपंत–यांनीं म्हटलें आहे कीं, " मरण

रुचे वीराला ! न रुचे क्षणमात्र अपयशाचें !!" या क्षत्रिय धर्माप्रमाणेंच वर्तन केलें. शत्रूच्या अफाट सेनासमूहाबरोबर हजार दोन हजार मावळ्यांचा किती निभाव लागणार ? परंतु ह्या तिन्ही वीरांनीं आपला देह रणांगणीं अर्पण करीपर्यंत दिल्लेरखानाचा किल्ल्यांत शिरकाव होऊं दिला नाहीं. शेवटीं निरुपायास्तव म्हणा किंवा ह्या वीरांच्या पराक्रमाची जाणीव होऊन दिल्लेरखानानें ह्या युद्धाचा शेवट तात्पूर्ता तह करून केला. दिल्लेरखानास स्वपराक्रमानें किल्ला पहावयास मिळाला नाहीं. तेव्हां ह्या तहानंतर त्यानें किल्ला पहाण्याची इच्छा तृप्त करून घेण्याचा मानस **शिवाजीस** कळविला. शिवाजीनें तें त्याचें ह्मणणें मान्य करून किल्यावर मोठा दरबार भरविला. त्यावेळीं **चरित्रनायक,** निराजी आनंदराव, नागोजी फर्जंद, हिरोजी फर्जंद वगैरे वीस पंचवीस मातबर सरदारांचे अंगांवर जवाहिराचे व मोत्याचे कंठे, तुरे आणि अंगावर भरगच्ची पोशाख महाराजांनीं देऊन दरबार मोठ्या थाटाचा भरविला.

**चरित्रनायकांचें** घराणें पुरातन वतनदार असून धनसंपन्न होतें, त्यामुळें दरबारांत **चरित्रनायक** मानकरी या नात्यानें असत. त्याखेरीज त्यांनीं **शिवाजीमहाराजांस** स्वराज्य स्थापण्यास प्रथमपासून शौर्यानें, धैर्यानें व मुत्सद्दीगिरीनें मदत करून मराठ्यांचा **भगवा झेंडा** सर्वत्र प्रसिद्ध करून आपलें नांव ह्या महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर करून, आपले वयाचे ५५ वर्षीं म्हणजे सन १६७० त आपला देह विसर्जन केला. ही बातमी महाराजांस समजली तेव्हां त्यांचा हृदयगिरी या दुःख वज्रानें भेदून गेला. स्वातंत्र्याच्या मोहिमेस प्रारंभापासून मदत केलेल्या आपल्या मित्राचा अंत झाला. हें ऐकून महाराजांस फारच दुःख झालें त्यांच्या उच्च मनोरथसिद्धीचें खरें साधन नष्ट झालें. त्यामुळें त्यांच्या विवेकी व विरक्त मनाची देखील चमत्कारिक स्थिती व्हावी ह्यांत आश्चर्य तें काय ?

**चरित्रनायका**च्या कृत्याची योग्य जाणीव **महाराजांस** असल्यामुळें त्यांनीं त्याचा मुलगा **रामाजी** यांस बोलावून आणून वडिलाच्या मृत्युबद्दल त्यांचें शांतवन करून मुसेखोऱ्यांतील दहा गांवाचे कुळकर्णाचे हक्क वंशपरंपरेनें त्यांचे नांवें करून दिले. आणि वडिलांच्या सरदारीवर त्याची नेमणूक केली.


वीर–रत्न बाजी प्रभु, देशपांडे.

# यांचें चरित्र.

लौकरच प्रसिद्ध होईल.

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.**

# उपसंहार.

## स एव धन्यो विपदि स्वरूपं न विमुंचति ।

( विपत्काल प्राप्त झाला असतांहि जे आपलें स्वरूप म्हणजे आचरण बदलीत नाहींत तेच धन्य ).

आजपर्यंत या भरतखंडांत अनेक राजे होऊन गेले, व अनेक राज्यें उदयास्त पावलीं. त्यांचा पुराणांतरीं इतिहास वाचिला असतां, असें दिसून येईल कीं, ज्या स्वसुखनिरभिलाष पुरुषांनीं, मागें स्वपराक्रमाच्या जोरावर मोठमोठीं राज्यें स्थापून, आपल्या धवल यशानें आर्यवंश धन्य केलें, त्यांना तीं महत् कार्यें संपादण्यांत थोडीं संकटें किंवा थोडे हाल सोसावे लागले नाहींत, त्यांजवर जे जे, भयंकर प्रसंग गुदरले, व स्वातंत्र्य सुखाकरितां किंवा सदैव पूज्य अशा आपल्या पूर्वजांचा तेजस्वीपणा कायम राखण्याकरितां त्यांनीं आपल्या जिवाचें जे स्वाहाकार केले, त्यांचा विचार केला असतां, असें खचित वाटतें कीं, त्यांच्या आंगीं विलक्षण धैर्य व असाधारण स्वाभिमान नसता, तर त्यांचा कुलदीपकपणा व त्यांच्या अपूर्व पराक्रमाचा महिमा आजवर त्रैलोक्यांत खचितच दुमदुमत रहाता ना. त्यांनीं संपादिलेलें ऐश्वर्य व त्यांनीं स्थापिलेलीं राज्यें, उत्कर्ष आणि अपकर्ष, त्या अवस्थाद्वयास भोगून जरी नाहींशीं झालीं, किंवा आजमितीस त्यांचा मागमूस देखील राहिला नाहीं, तरी तीं संपादण्याचे कामीं त्यांनीं घेतलेले अश्रांत श्रम, व त्यांजवर कोसळलेल्या अरिष्टांतून पार पाडण्याकरितां त्यांनीं योजिलेले शहाणपणाचे उपाय, गुरुस्थानीं होऊन, आपल्यास अद्याप पढवीत आहेत, इतकेंच नव्हे, तर ते सदोदित असेंच पढवीत रहातील,

परंतु परवशेतेनें गांजून गेल्यामुळें धुळीस मिळालेल्या महाराष्ट्रीयांच्या ठायीं स्वातंत्र्येच्छा उत्पन्न करून, त्यांचीं शौर्यश्री एकवार जगावर गाजविण्यास तीं पूर्वजांचीं उदाहरणेंच कारणीभूत झालीं व पुढेंहि होतील.

वरील प्रमाणेंच या **दिघे, देशपांडे** घराण्यांतील कित्येक **नर-रत्नें** बहामनी राज्यांत व त्याचें विभागांत, आपल्या मर्दुमकीनें, व मुत्सद्दिगिरीनें, प्रसिद्धिस आलीं. याच वंशांतील सोबत दिलेल्या वंशावळांतील मूळपुरुष **गोपाळ प्रभु** हा बहामनी राज्यांत, पाली उर्फ अमीनाबद येथें देशमुखीचे वतनावर होता. त्याच्यापूर्वीं हें वतन कोणीं संपादन केलें. ह्याची माहिती उपलब्ध झालेली नाहीं. सदरहू **गोपाळप्रभुस** दोन पुत्र होते; ते-**मीठप्रभु** व **जोगदप्रभु**-मीठप्रभु मोसेखोरें येथील वतन संपादन करून प्रसिद्धीस आला. त्याचे वंशजांस मोसेखोरेकर म्हणतात. व **जोगदप्रभु** यानें पौडखोरें व मुठखोरें येथील वतन संपादन करून तो प्रसिद्धीस आला. ह्याप्रमाणें ह्या घराण्याच्या अनुक्रमें मोसेखोरेंकर व मुठेखोरेंकर अशा दोन शाखा झाल्या.

मोसेखोऱ्यांतील **चरित्रनायक** व त्यांचे चिरंजीव **रामाजी** हे शिवाजी महाराजांचें कारकीर्दींत एकनिष्ठेनें स्वराजसेवा व्यक्त करून प्रसिद्धीस आले. पुढें ह्या घराण्यांतील पुरुष छत्रपति शाहूमहाराजांचें कारकीर्दीअखेरपर्यंत, अनेक हुद्यावर असलेल्याची माहिती उपलब्ध होते. तथापि पुढील पेशवाईंत ह्या सुप्रसिद्ध घराण्यांतील वंशजांच्या पराक्रमाचा ठावठिकाणा लागत नाहीं. असो !

सदरहू घराण्याच्या दुसऱ्या शाखेंतील **आबाजी विश्वनाथ दिघे**, हा सन १६४९ त शिवाजी महाराजांकडे नामजादा, ह्या हुद्यावर प्रथम नोकरींत राहून

त्यानें अनेक प्रसंगीं गुप्त हेराचीं व अनेक लढाईंत शौर्याचीं कामें करून आपला पराक्रम महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरंतन करून ठेविला आहे. शिवाजी महाराज, राजाराम महाराज व पंत सचीव यांनीं त्यांस त्याच्या पराक्रमाचें पारितोषिक ह्मणून अनेक गांवें इनाम दिल्याच्या सनदा आहेत. हा शूर सरदार सन १६९४ त मोगलांचा सरदार, शाबादीखान, यानें तोरणा किल्यास वेढा घातला. त्याज-बरोबर लढत असतां धारातीर्थीं पतन पावला.

आबाजी विश्वनाथ धारातीर्थी पतन पावला ही बातमी राजाराम महाराजांस व शंकराजी नारायण सचिवांस कळली. तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें. त्यावेळीं त्याचा मुलगा **जनाजी** हा अज्ञान होता. तरी त्यांस त्याच्या वडिलांच्या पराक्रमाची जाणीव होऊन, **जनाजीची** सरदारांत नेमणूक करून एक गांव वंशपरंपरा इनाम देऊन, खेरीज एक हजार होन सरंजामी करून दिली, त्या सनदेची अस्सलवरून केलेली नकल त्यांचे वंशजांकडून मिळाली आहे. ती वाचकांचे माहितीकरितां येथें देतों.

**श्री**

श्री
शंकराजी
नारायण.

इ. स. १६९५.

वर्कु सनद म॥ **जनाजी आबाजी** सभासद प्रयोजन लेखक सबनिसी दिम्मत खासखेली हासम पावली सुरु सन सीत तिसैन अलफ–मशारनिल्हेंचे बाप आबाजी विश्वनाथ हे किल्ले प्रसन्नगडीं नामजाद होते किल्लेमजकुर साल

गुदस्तां गनिमानें घेतला ते समयीं मशारनिल्हे युद्धप्रसंगामध्यें स्वामिकार्यावरी पडले याचें चालविणें अगत्य ह्मणून जनाजी आबाजी याची असामीं सभासदांत घालून सबनिसीचें कार्य भागास दिलें मशारनिल्हेचें वय लहान याजबद्दल मुतालीक देऊन पेशजी हुजरून सदन करून दिली किल्लेदार कोरीगड सालमकूरीं गनिमानें हस्तगत केला. ते समयीं सनद वर्कु ( ? ) गेला याबद्दल राजेश्री पंत सचीव यांनीं पेटक्बारीगड मुक्कामीं नजर गुजार करून पेशजी सरंजामी केली त्याप्रमाणें करार करून सनद वर्कु केला असामी २ येकूण तैनात सालीना देखील चाकर.

होनपान

१०००

तपशील

खासा जनाजी आबाजी याची असामी सभासदांत घालून सबनिसीच्या लिहिणीयाच्या कामास दिलें वेतन. सालिना देखील चाकर

होनपान

७००

मशारनिल्हेचें वय लहान याजबद्दल मुतालीक दिल्हा असामी १ एकूण सालिनी देखील ३०० होनपान

एकूण तैनाती सालीना देखील चाकर होनपान एकहजार रास केले असतें इस्तकबिल पेशजी हुजूरून आली आहे त्या दिवसापासून सुभा वसूल पडला. त्याप्रमाणें वजा करून उरलें तें माहे दरमाहे पावत जाईल............पेश-

जीं घेतला आहे तो दूर करून हल्लीं नरसो भिकाजी सभासद सेवक मजमू हुजूर घेतले असेत.

तारीख १२ जमादिलावल.

पत्रावधि

रयं भाति

याप्रमाणें सनद असून हा जनाजी पुढें श्रीशाहूमहाराजांचे कारकीर्दींत स्वपराक्रमानें प्रसिद्धीस आलेला आहे.

याच सुप्रसिद्ध घराण्यांतील **बापुजी सोनाजी** हा नागपूरकर परसोजी भोसला याजकडे जमेनिसीकडे असतांना सन १७०७ त **श्रीशाहूमहाराज** दिल्लीहून सुटून वऱ्हाडांत लांबकानीचे मुक्कामीं आले, त्यावेळीं ताराबाई-साहेबानीं मोठें राजकारण करून हा खरा शाहू नसून तोतया आहे, असें प्रतिपादन करून **शाहूमहाराजांस** दक्षिणेंत येण्याचा अडथळा केला. त्यावेळीं **शाहूमहाराजांचा** मुक्काम लांबकानीं याच ठिकाणीं होता. तेथें **बापुजी सोनाजी** हा येऊन भेटला. त्यावेळीं **शाहूमहाराजांनीं बापुजीस** सांगितलें कीं, इकडील सरदारांचा व आमचा परिचय नाहीं, जर सर्व मंडळी अनुकूल करून घ्याल, तर स्वामीचें महत्कार्य केल्याचें होईल. त्याप्रमाणें **बापुजी** परत नागपुरास येऊन त्यानें **परसोजी व साबाजी भोसले** यांस कळविलें, **ताराबा-**

**ईचा** इरादा **शाहूस** राज्यपद द्यावयाचें नाहीं; परंतु आपला खरा धनी **शाहूम-महाराज** असोन त्याजवर **ताराबाईच्या** ह्मणण्याप्रमाणें शस्त्र धरणें आपणांस योग्य नसोन ह्या प्रसंगीं त्याजला मदत केल्यास परमेश्वराकडे रुजू होईल. अशा प्रकारें सांगोन, **साबाजी भोसल्यास** आपल्या फौजेसह **शाहूमहाराजांस** भेटविले. तेव्हां **महाराज बापुजीवर** संतोषीत होऊन साताऱ्यास आल्यावर दोन गांव इनाम दिले. त्या सनदेची अस्सल वरून नक्कल त्यांचे वंशजांकडून आली ती वाचकांच्या माहितीकरितां येथें देतों.

श्री

वर्धिष्णु विक्रम
विष्णु सामुर्ति रिव वा
मनी शंभु सुनोर
सोमुद्रा सीवराज्यस्य
राजते

स. १७०९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी संवत्सरे आषाढ बहुल पंचमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहूछत्रपति स्वामी यांणीं मशारूल

श्री
शाहुनरपति
हर्षनिधान मोरेश्वर
सुत भैरव प्रधान

बापुजी सोनाजीप्रभु उपनाम दिघे देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी तर्फ मुठेखोरे सुभा प्रांत मावळे यासी दिल्हे इनामपत्र ऐसाजे स्वामी परराष्ट्रांतून स्वराज्यांत आले त्या प्रसंगीं तुम्हीं राजश्री परसोजी भोसले यांची जमेनिसी करून असतां त्यांचे तर्फेनें स्वामिचे दर्शनास येऊन लांबकानीची मुक्कामीं दर्शन

घेतलें स्वामिचे आज्ञेवरून राजश्री परसोजी भोसले यांस फौजेनिसी स्वामींचे दर्शनास आणिलें ते प्रसंगीं तुम्हीं सेवा बहुत एकनिष्ठेनें केली व पुढेंहि निष्ठेनें वर्तणुक कराल तरी तुमचे उर्जित करून वंशपरंपरेनें चालवणें हें स्वामीस आवश्यक याकरितां व तुम्हीं विनंती केली कीं आपण स्वामींचे राज्यांतील वतनदार सेवक आहों जें उर्जित करणें तें वतन संमधावर केलियानें परंपरागत चालेल त्यावरून स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन नुतन इनाम देहे तर्फ मुठेखोरे पैकीं २

१ मौजे बहुली 　　　　　　　　　 १ मौजे टेमघर

असे दोन गांव इनाम कुलबाब कुलकानु खेरीज हाकदार व इनामदार करून चतुःसीमा भूमी पूर्वमर्यादेप्रमाणें देखिल जळ तरु पाषाण झाडझाडोरा निधिनिक्षेप सहित इनाम अजरा मऱ्हामत करून दिल्हे असे तरी सदरहू दोनी गांवाचा इनाम उपभोग तुम्हीं व तुमचे वडिलांचे बाप भाऊ जनाजीराम देशकुळकर्णी समेत पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें आनुभावून सुखरूप आसणें स्वामी व स्वामींचें वंशपरंपरेनें तुम्हास इनाम दोन्ही गांव चालवितील जाणिजे निर्देश समक्ष

तेरिख १९ रबिलाखर

मर्यादेयं

राजते

तिस्सामया 　　　　 बार सुरु सुद्र बार

याप्रमाणें दोन गांवाची सनद वंशपरंपरेनें असून "पदांती पऱ्हा सहश्री" ( हजार पायदळांचे सरदार ) नेमले.

याच घराण्यांत **बाजी महादेव** हा सन १७४९ त **बाळाजी बाजीराव** पेशवे ह्यांच्या हुजुरांत नोकरींत राहून, त्यानेंही आपल्या पूर्वजाप्रमाणें बाणेदारपणा दाखविण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं यमाजी शिवदेवानें सांगोला येथें बंड केलें, तें मोडण्याकरितां **सदाशिवरावभाऊ** बरोबर **बाजी महादेव** गेला होता. तेथें त्यानें जें शौर्याचें कृत्य केलें, त्यामुळें भाऊसाहेबानें त्यांस २५ स्वरांची शिलेदारी दिली. त्यानें सन १७७४ पर्यंत अनेक लढायांत आपला पराक्रम पेशवाईंत गाजविला. ह्याच सुमारास नारायणराव पेशव्यांचा वध झाला. नारायणरावांचा वध म्हणजे भटशाहीचा अंत व बारभाई अगर भानूंचा उदय! ह्यावेळीं जो जातीमत्सर उद्भवला त्यांत अनेक शिवकालीन घराण्यांतील सरदार पेशवाईंतून निघून गेले, त्यांत **बाजी देशपांडे** हा गोविंदराव गायकवाडांकडे गेला. तेथें तो आपल्या पराक्रमानें उदयास आला.

शिवाजीमहाराजांनीं जातिभेदाचें जाचक स्वरूप पुष्कळच कमी केलें, त्यामुळें त्यांस आपल्या छत्राखालीं सर्व महाराष्ट्र एकवटतां आला. ही स्थिति पुढें टिकली नाहीं. पेशवाईंत मराठ्यांच्या दौलतीचा विचार स्वजातीयापलिकडे विशेष राहिला नाहीं, आणि लौकिक सहानुभूतीचें अधिष्ठान हळू हळू सुटत चाललें. राज्याची शाश्वती सामान्यजनांच्या जिव्हाळ्यावर अवलंबून असते. परदेशी लोकांची फलटण उभी केल्यानें फौजफाटा वाढला तरी दौलतीचा अभ्युदय होत नाहीं. पेशवाईंत मावळ्यांच्या फलटणी नष्ट करून त्यांच्याऐवजीं गारद्यांची व अरबांची शिबंदी वाढविली. ज्या जातींच्या लोकांना

स्वराज्यसत्तेविषयीं आपलेपणा वाटत होता, त्यांस मागें सारून ज्यांस स्वराज्यसत्तेविषयीं आपलेपणा वाटत नव्हता, अशांकडून ती राजसत्ता चिरस्थायी कशी व्हावी ? शिवशाही सोडल्यास मराठ्यांच्या इतिहासांत असा प्रसंग क्वचितच आढळतो कीं, महाराष्ट्रांतील जनतेचें चित्त राष्ट्रीय कार्यांत व्यग्र झालें आहे. पेशवाईंत तर मूठभर व्यक्तींनीं राजसत्ता करावी, व बहुजनसमाजानें उदास राहून तिचा उत्कर्ष पहावा. अशी त्यावेळीं महाराष्ट्राची परिस्थिति होती. जातिभेदामुळें जातीजातींच्या संस्कृतींत इतकें अंतर पडलें होतें कीं, एका जातीला दुसऱ्या जातीच्या भावना आकलन करणें बहुतेक अशक्यच झालें होतें. त्यामुळें राष्ट्रीयत्वाचा जिव्हाळा उत्पन्न होणें अशक्य झालें. अशा स्थितींत कित्येक स्वसंरक्षणार्थ महाराष्ट्रांतून निघून गेले. पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें राखेंत दडपलेली इंगळी दडपण नाहींसें होतांच आपलें प्रखर तेज फांकू लागते, त्याप्रमाणें हे जिकडे गेले, तिकडे वाव मिळतांच आपलें तेज पसरूं लागले. त्याप्रमाणें **विठ्ठलराव देवाजी** हे स्वपराक्रमानें गायकवाडींत उदयास आले. हें प्रासिद्धच आहे. त्याच वंशांत **बापुजी रघुनाथ** हेहि स्वपराक्रमानें प्रसिद्धीस येऊन धार व ग्वालेरचे दिवाण झाले.

ह्याच सुप्रसिद्ध घराण्यांत **त्रिंबक मोरेश्वर** यांनीं **पंतसचिवांचे** दरबारीं अनेक राष्ट्रहिताचीं कामें करून **दप्तरदारी** व **कोटनिसी** हे दरख मिळविले. त्याचप्रमाणें त्यांनीं मोसेखोऱ्यांतील **दप्तरदारीचा** दरख संपादन केला. त्यांस तीन पुत्र होते तेः– ( १ ) दाजीबा ( २ ) भैराळ व ( ३ ) खंडेराव, पहिले दाजीबा हे वडिलांचे मागें भोर संस्थानच्या दप्तरदारीचें काम करीत असतां, सचिवावर शत्रू चालून आला, त्याजबरोबर लढून त्यांनीं सचिवाचा बचाव केला. त्याबद्दल सचिवानें त्यांस सालीना रु. ३०० व दप्तरदारीचा दरख करून

दिला. त्याची सनद उपलब्ध झाली आहे, ती वाचकांच्या माहितीकरितां येथें देतोंः—

अस्सलवरून नक्कल
सन १७६३

श्री

राजमान्य राजश्री दाजीबा त्र्यंबक गोसावी यांस—

स्ने ॥ **सदाशीव चिमणाजी सचीव** आसिर्वाद सुमा आर्बा सीतैन मयाव अलफ तुह्मी संस्थानांत श्रम साहस करून सरकार उपयोगी बहुत पडला आणि लिहीणार सरंदाज ऐसें जाणून पहिल्यापासून दप्तरदारीचा दरक संवस्थानांत नाहीं तो तुम्हांस खुद जातीस सांगोन वेतन सालीना ३०० तीनसे करार करून दिल्हे असे तरी इमानें इतबारें दप्तरदारीचें दरकाचें कामकाज करीत जाणें नेमणुके प्रो वेतन पावेल जाणिजे छ १ माहे × × हुजूर ( शिक्का ) मोर्तब सूद.

ह्याखेरीज त्यांनीं आणखीहि पराक्रमाचीं व मुत्सद्दीगिरीचीं अनेक कामें केल्यामुळें सचिवानें त्यांस आपल्या दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं होतीं.

दुसरा **मैराळ** हा कोटनिसीचा दरक संभाळून होता. तिसरा **खंडेराव** यासंबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं; परंतु त्याचा मुलगा **सदाशीव** फारच पराक्रमी व मुत्सद्दी होता. त्यानें सचिवाच्या दौलतीचा कारभार व संस्थानच्या संरक्षणार्थ शत्रूंबरोबर अनेक लढाया केल्या. ह्या त्याच्या पराक्रमाचें पारितोषक म्हणून सचिवानें त्यांस पौन मावळांतील " साठेसाही " हा गांव इनाम दिला. ह्यानेंच सन १८५७ बंडाच्या वेळीं बंडखोरांच्या पारि-

पत्याकरितां इंग्रजांस मदत केली. म्हणून त्यांस कंपनी सरकारकडून मावळांतील "वांगणी" हा गांव इनाम मिळाला. वरीलप्रमाणें ह्या सुप्रसिद्ध घराण्यांतील पुरुषांची व त्यांच्या पराक्रमाची उपलब्ध झालेली शक्य ती माहिती दिली आहे. अद्याप पुष्कळ माहिती उपलब्ध होणें आहे. ती झाल्यास सदरहू घराण्याचा महत्वाचा इतिहास प्रासिद्ध होईल, करितां ह्या घराण्यांतील मंडळीनें आपल्या पूर्वजांची ऐतिहासिक माहिती शक्य ती प्रसिद्ध करावी, तेणेंकरून महाराष्ट्राच्या इतिहासांत भर पाडावी, अशी त्यांस आमची नम्र सूचना आहे.

या दिक्षीत उर्फ दिघे घराण्याच्या दोन्ही शाखांचा वंशवृक्ष फारच विस्तृत आहे. तो हल्लींच्या परिस्थितींत छापून प्रसिद्ध करणें आम्हांस शक्य नसल्यामुळें, फक्त चारित्राच्या महत्वापुरताच येथें दिला आहे. मुठेखोऱ्यांतील दिघ्यांचा वंश. वृक्ष अप्रसिद्धच आहे; परंतु मोसेखोरेकर दिघे, यांचा वंशवृक्ष सन १९०३ मध्यें बडोदें येथील कै. चौककर यांनीं प्रसिद्ध केला आहे.

असो ! ह्या घराण्यांतील ऐतिहासिक माहिती ज्यांनीं प्रासिद्ध केली आहे. त्यांचें अभिनंदन करून लेखणी थांबविण्यापूर्वीं इतकीच इच्छा प्रदर्शित करितों कीं, आज **चरित्रनायका**चें देहावसान होऊन सुमारें २५४ वर्षांनीं त्यांच्या कीर्तिध्वजांची आठवण महाराष्ट्रीय वाचकांस करून देत आहे. त्याचा आदर त्यांजकडून होईल अशी पूर्ण उमेद आहे.

समाप्त.

# वंशवृक्ष.

**गोपाळप्रभु** ( स्त्री आनाबाई )–मृत्यु १५६४

- मीठप्रभु ( मोसेखोरेकर ) ( स्त्री लक्ष्मी )
  - गोजप्रभु ( स्त्री कमला )
    - काऊजी ( स्त्री रखमाबाई )
      - मलप्रभु ( स्त्री आबाई )
        - काऊजी ( स्त्री दीपाबाई )
        - बाबाजी
        - कृष्णाजी
        - बापुजी उर्फ नानाजी ( स्त्री गिरजाबाई )
    - बहिरजी *
    - राम *
  - पिलप्रभु ( स्त्री आबाई ) वंश चालू
  - तानप्रभु ( स्त्री राधाबाई ) वंश चालू
  - महादप्रभु ( स्त्री भानाई )
    - अनंत
      - विठ्ठल
        - काकाजी ह्यांचे वंशज विठ्ठलराव देवाजी उर्फ काठेवाड दिवाणजी
        - मोराजी ह्यांचे वंशज बापुजी रघुनाथ दिवाण धार
- ( १ ) **जोगदप्रभु** ( स्त्री गंगा ) ( पौंडखोरे व मुठेखोरेकर

खंडप्रभु *

**विसाजी उर्फ विश्वासराव**
( स्त्री काशीबाई )
जन्म १६१५ मृत्यु १६७०

गोविंद

विठ्ठल *

**राघोजी उर्फ रामाजी**
*
गोविंद
वंश चालू

बापुजी
वंश चालू

---

( १ ) **जोगद्प्रभु** ( स्त्री गंगा )
( पौडखोरे व मुठेखोरेकर )

भूतप्रभु
( पौडखोरे येथील देशकुळकर्ण
व गांवकुळकर्ण मिळविळविले )
वंश चालू

अमरप्रभु
( मुठेखोरे येथील
वतन संपादिले
याचा वंश उरवडे
येथें आहे )

जयतप्रभु
पौडखोर
हा जन्मांध
होता
वंश चालू

कुकप्रभु
( उंबरडी तर्फ
निजापूर )
वंश चालू

ह्याची वंशावळ आबाजी विश्वनाथ यांचें चरित्रांत देण्यांत येईल.